जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## नगर-पाथर्डी रोडवर अपघात; होमगार्डसह आईचा जागीच मृत्यू




नगर - महाशिवरात्रीच्या दिवशी दर्शनासाठी निघालेल्या मायलेकावर काळाने झडप घातली. कल्याण-निर्मल राष्ट्रीय महामार्गावरील टाकळी फाटा येथे दुचाकी व हुंडई कार यांच्यात झालेल्या भीषण अपघातात उमेश जगन्नाथ औटी (वय ४४) आणि त्यांच्या आई कौशल्या जगन्नाथ औटी (वय ६६, रा. औटीवस्ती, पाथर्डी) यांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला. या घटनेने पाथर्डी शहर व परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

महाशिवरात्रीनिमित्त उमेश औटी हे आपल्या आई कौशल्या औटी व मुलासह दुचाकीवरून पाथर्डी तालुक्यातील तोंडोळी येथील हरिहरेश्वर मंदिरात दर्शनासाठी १५ फेब्रुवारी रोजी दुपारी निघाले होते. कोरडगाव रोडवरील टाकळी फाटा येथे समोरून येणाऱ्या हुंडई कारची त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक बसली. अपघात इतका भीषण होता की उमेश औटी व कौशल्या औटी यांना गंभीर दुखापत झाली. स्थानिक नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत जखमींना रुग्णालयात नेले. मात्र अहिल्यानगर येथे त्यांना हलवण्यात आले. डॉक्टरांनी त्यांना उपचारापूर्वीच मृत घोषित केले. या दुर्घटनेत सोबत असलेली लहान मुलगी सुदैवाने बचावली असल्याची माहिती मिळाली आहे.

उमेश औटी हे पाथर्डी होमगार्ड दलात कार्यरत होते. कर्तव्यनिष्ठ व मनमिळाऊ स्वभावामुळे ते सर्वत्र परिचित होते. होमगार्डच्या सेवेसोबतच ते मोलमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. त्यांच्या आकस्मिक निधनाने परिसरात शोककळा पसरली आहे. महाशिवरात्रीच्या दिवशीच आई -मुलाचा दुर्दैवी अंत झाल्याने हळहळ व्यक्त केली जात आहे.

पाथर्डी पोलिस ठाण्यात अपघाताची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

## लखन आढाव यांचे अल्प आजाराने निधन



भिंगार - भिमनगर भिंगार येथील रहिवासी लखन कृष्णा आढाव (वय ३६) यांचे १६ फेब्रुवारी रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर १७ फेब्रुवारी रोजी भिंगार अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे आई, पत्नी, १ मुलगा, २ भाऊ, भावजय असा परिवार आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी न्याय विभागाचे भिंगार शहराध्यक्ष सिद्धार्थ आढाव याचे ते मोठे बंधू होत.

## अमृतलाल गुगळे यांचे हृदयविकाराने निधन



नगर - आनंदधाम येथील रजनीगंधा अपार्टमेंट येथील रहिवासी अमृतलाल हिरालाल गुगळे (तेलकुडगाववाला, वय ७५) यांचे १७ फेब्रुवारी रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. प्रशांत गुगळे, शिल्पा गांधी यांचे ते वडील होत.

## सत्यभामाबाई सुरसे यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - देवटाकळी (ता.शेवगाव, हल्ली मु. केडगाव) येथील रहिवासी सत्यभामाबाई निवृत्ती सुरसे (वय ८४) यांचे १७ फेब्रुवारी रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर केडगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुले, १ मुलगी, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. केडगाव येथील नागेश्वर टेलर्सचे एकनाथ व मिनीनाथ सुरसे यांच्या त्या मातोश्री होत.

## सुनीताबाई लोढा यांचे अल्प आजाराने निधन



नगर - विनायकनगर येथील रहिवासी सुनीताबाई संतोष लोढा (वय ४२) यांचे १६ फेब्रुवारी रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अरमधाम येथे करण्यात आले.


त्यांच्या मागे सासु, पती, १ मुलगी असा परिवार आहे.

## रामप्रसाद कदम यांचे अल्प आजाराने निधन



नगर - मानवत तालुक शेवडी जहांगीर येथील रहिवासी रामप्रसाद शंकरराव कदम (वय ६३) यांचे १६ फेब्रुवारी रोजी पहाटे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर दुपारी ३ वा. अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ भाऊ, ५ बहिणी असा परिवार आहे.

मानवत कृषी उत्पन्न बाजार समितीचे सेवानिवृत्त सचिव बाळासाहेब कदम यांचे ते धाकटे बंधू होत.



हनुमान चालिसा पाठ

बुधवार दि. १८/०२/२०२६
रात्री ८.३० ते १०.३०

श्री दक्षिणमुखी हनुमान सत्संग मंडळ, सर्जेपुरा, अहिल्यानगर

**ज्योती प्रकाश फुलडहाळे**, निलायम सोसायटी, गणपती मंदिरा शेजारी, विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
मो.७६६६१३१२७४

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

## 'शेअर ट्रेडिंग'च्या आमिषाने २४ लाख रुपयांची फसवणूक

### चौघा जणांच्याविरुद्ध नगरच्या सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

नगर - शेअर बाजारामध्ये गुंतवणूक करून अधिक नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून एका तरुणाची तब्बल २४ लाख २० हजार रुपयांची फसवणूक केल्याची धक्कादायक घटना अहिल्यानगरमध्ये समोर आली आहे. या प्रकरणी सायबर पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

याबाबत आगरकर मळा राहणारे व खाजगी नोकरी करणाऱ्या ३२ वर्षीय तरुणाने फिर्याद दिली आहे. त्यांच्या तक्रारीनुसार, निधी मिश्रा, अखील वर्मा, अदिती शर्मा आणि अनिल सिंग या संशयित आरोपींनी संगनमत करून हा गुन्हा केला. आरोपींनी व्हॉटसअपच्या माध्यमातून फिर्यादीशी संपर्क साधला होता. 'शेअर ट्रेडिंगमध्ये पैसे गुंतवल्यास मोठा परतावा मिळेल' असे सांगून आरोपींनी प्रताप यांचा विश्वास संपादन केला.

३ ते १२ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत फिर्यादीला गुंतवणुकीच्या जाळ्यात ओढून त्यांच्याकडून वेळोवेळी एकूण २४ लाख २० हजार रुपये उकळले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच दिवटे यांनी सायबर पोलिसांकडे धाव घेतली. या फिर्यादी वरून पोलिसांनी चौघांच्या विरुद्ध बीएनएस कलम ३१८ (४), ३१९ (२) व माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६ (ड) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांच्या मार्गदर्शनाखाली या गुन्ह्याचा तपास सुरू आहे. नागरिकांनी अनोळखी व्यक्तींच्या गुंतवणुकीच्या आमिषाला बळी पडू नये, असे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## ऑनलाईन पैसे पाठविल्याचा बनाव करून नगरमध्ये ५० हजार रुपयांची फसवणूक

नगर - शहरातील वाडिया पार्क परिसरातील एका मोबाईल शॉपीमध्ये ऐन दुपारी फसवणुकीचा धक्कादायक प्रकार घडला आहे. रोख रक्कम घेऊन त्याबदल्यात बनावट ॲप्लिकेशनद्वारे ऑनलाईन पैसे पाठवल्याचे भासवून एका भामट्याने तरुणाची ५० हजार रुपयांची फसवणूक केल्याची घटना १३ फेब्रुवारी रोजी दुपारी १ वाजेच्या सुमारास घडली. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आष्टी तालुक्यातील दादेगाव येथील रहिवासी आणि मोबाईल व्यावसायिक सर्फराज मुक्तार सय्यद हे आपल्या मित्रासह अहिल्यानगरमध्ये मालाची खरेदी करण्यासाठी आले होते. वाडिया पार्क परिसरातील केडीएम मोबाईल शॉपीमध्ये साहित्य पाहत असताना आरोपी अनिकेत पठारे (रा. मावळेवाडी) याने त्यांच्याशी संपर्क साधला. मला रोख रकमेची गरज आहे, मी तुम्हाला ऑनलाईन पैसे पाठवतो, असे सांगून आरोपीने सर्फराज यांचा विश्वास संपादन केला. त्यावर विश्वास ठेवून फिर्यादीने ५० हजार रुपये रोख अनिकेतच्या हवाली केले. पैसे घेतल्यावर आरोपीने मोबाईलवर व्यवहार यशस्वी झाल्याचा बनावट संदेश दाखवला आणि तेथून पसार झाला. मात्र, बराच वेळ होऊनही खात्यात पैसे जमा न झाल्याने आपली फसवणूक झाल्याचे सर्फराज यांच्या लक्षात आले. शहरात शोध घेऊनही आरोपी सापडला नाही. अखेर या फसवणुकीबाबत सर्फराज सय्यद यांनी आरोपी अनिकेत पठारे विरुद्ध कोतवाली पोलिसांत तक्रार दिली असून पोलिसांनी या प्रकरणी बीएनएस कलम ३१८ (२), ३१६ (२) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

## केवायसी अपडेट करण्याच्या बहाण्याने सेवानिवृत्ताची चार लाखांची फसवणूक

नगर - बँक खात्याचे केवायसी अपडेट करण्याच्या बहाण्याने एका सेवानिवृत्त व्यक्तीची ४ लाख ३० हजार रुपयांची फसवणूक झाल्याची धक्कादायक घटना भिंगार परिसरात घडली आहे. याप्रकरणी बंडू उत्तम येणारे (वय ४२, रा. वैद्य कॉलनी, जामखेड रोड) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

एका अज्ञात आरोपीने फिर्यादी येणारे यांना फोन करून आपण स्टेट बँकेतून बोलत असल्याचे भासवले. तुमच्या खात्याचे केवायसी अपडेट करायचे आहे, असे सांगून आरोपीने त्यांचा विश्वास संपादन केला. त्यानंतर फिर्यादीच्या मोबाईलवर आलेला ओटीपी चोरट्याने शिताफीने मिळवला. या ओटीपीचा वापर करून चोरट्याने फिर्यादीच्या स्टेट बँकेच्या खात्यातून ४ लाख ३० हजार रुपये आरटीजीएसद्वारे बँक ऑफ इंडियाच्या एका खात्यावर वळवून घेतले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच येणारे यांनी पोलिसांत धाव घेतली. या प्रकरणी पोलिसांनी अज्ञात आरोपी विरुद्ध भारतीय न्याय संहितेचे कलम ३१८ (४), ३१६ (२) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. सध्या पोलीस या प्रकरणाचा तांत्रिक तपास करत असून नागरिकांनी कोणालाही आपला ओटीपी देऊ नये, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस हवालदार रेवनाथ मिसाळ हे करत आहेत.

## मेडीकलमध्ये नोकरानेच केला ४१ लाखांचा अपहार

नगर - शहरातील सथ्था कॉलनी परिसरातील एका नामांकित मेडीकलमध्ये तब्बल ४१ लाख १३ हजार ३८० रुपयांची फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, व्यवसायात विश्वासू मानल्या जाणाऱ्या कामगारानेच ही फसवणूक केल्याचे समोर आले आहे.

याबाबत मिळालेली अधिक माहिती अशी की, राजेंद्र चंद्रकांत मुंडलिक (वय ५७, रा. डोळसेवाडा, माळीवाडा) यांचे स्टेशन रोडवरील खालकर हॉस्पिटलमध्ये 'साई मेडीकल' नावाचे दुकान आहे. या दुकानात सागर शिवाजीराव कोल्हे (रा. दैठणे गुंजाळ, ता. पारनेर) हा तरुण औषध विक्रेता म्हणून कामाला होता. ग्राहकांना औषधांचे बिल देणे आणि पैशांचा हिशोब ठेवण्याची जबाबदारी त्याच्यावर होती.

आरोपीने एप्रिल २०२४ ते जुलै २०२५ या काळात ग्राहकांना पूर्ण रकमेची बिले दिली आणि त्यांच्याकडून सर्व पैसे वसूल केले. मात्र, मालकाला हिशोब देताना त्याने संगणकीय प्रणालीमध्ये फेरफार करून बिलाची रक्कम कमी दाखवली. अशा प्रकारे बिलातील फरकाची रक्कम तो स्वतःच्या खिशात घालत राहिला. हा प्रकार लक्षात आल्यानंतर मुंडलिक यांनी सर्व बिलांची तपासणी केली असता त्यात ४१ लाख १३ हजार ३८० रुपयांची फसवणूक झाल्याचे समोर आले. त्यामुळे त्यांनी पोलिसांत धाव घेतली. कोतवाली पोलिसांनी याप्रकरणी भारतीय न्याय संहितेचे कलम ३१८ (४), ३१६ (२) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

## शेअर मार्केटमध्ये गुंतवणुकीच्या नावाखाली ५७.७५ लाखांची फसवणूक करणाऱ्याला वर्षभरानंतर पोलिसांनी ठोकल्या बेड्या

नगर - शेअर मार्केटमध्ये गुंतवणुकीच्या नावाखाली नागरिकांना मासिक ८ ते १० टक्के परताव्याचे आमिष दाखवून तब्बल ५७ लाख ७५ हजार रूपयांची फसवणूक करणाऱ्या संशयित आरोपीस आर्थिक गुन्हे शाखेने अखेर अटक केली आहे. जानेवारी २०२५ पासून पसार असलेला लक्ष्मण राजू पातकळ (वय २७, रा. चापडगाव, ता. शेवगाव) याला छत्रपती संभाजीनगर येथून ताब्यात घेण्यात आले.

या प्रकरणी शेवगाव पोलीस ठाण्यात २७ जानेवारी २०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. दामू ऊर्फ दामोधर लक्ष्मण विघ्ने (वय ६५, रा. मंगरूळ बु., ता. शेवगाव) यांनी फिर्याद दिली आहे. या गुन्ह्याचा तपास येथील आर्थिक गुन्हे शाखेकडून केला जात आहे. पोलीस उपनिरीक्षक योगेश पवार करीत आहेत. लक्ष्मण पातकळ याने दत्तकृपा ट्रेडिंग या नावाने शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करण्याचा व्यवसाय सुरू केल्याचा भास निर्माण केला होता. गुंतवणूकदारांना दरमहा ८ ते १० टक्के परतावा देण्याचे आमिष दाखवून त्यांचा विश्वास संपादन करण्यात आला. त्यानंतर फिर्यादी व इतर ठेवीदारांकडून एकूण ५७ लाख ७५ हजार रूपये स्वीकारण्यात आले.

मात्र, गुंतवणुकीवर कोणताही परतावा न देता तसेच मूळ रक्कमही परत न करता संशयित आरोपीने ती रक्कम स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी वापरून पसार झाला होता. तो जानेवारी २०२५ पासून पसार होता व त्याचा कोणताही ठावठिकाणा लागत नव्हता. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली तांत्रिक विश्लेषण व माहितीदारांच्या मदतीने त्याचा शोध सुरू ठेवण्यात आला. तपासादरम्यान तो वरूड फाटा परिसरात, चिखलठाणा पोलीस ठाणे हद्दीत (जि. छत्रपती संभाजीनगर) असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार उपनिरीक्षक पवार, पोलीस अंमलदार कावरे, आव्हाड व फडतडे यांच्या पथकाने छत्रपती संभाजीनगर येथे जाऊन त्यास ताब्यात घेतले. त्यानंतर त्यास सदर गुन्ह्यात अटक करण्यात आली. न्यायालयाने २० फेब्रुवारी पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजूर केला आहे.



आ.संग्राम जगताप यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलनात काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ व टिपू सुलतान यांच्या प्रतीकात्मक पुतळ्यांचे दहन करण्यात आले.

## लाच घेताना पोलिसाला पकडले

नगर - शनि शिंगणापूर येथील शनि मंदिरासमोरील गाळामालकाकडून २ हजार रुपयांची लाच घेताना शिंगणापूर पोलीस ठाण्याचा पोलिस कर्मचारी अजय कृष्णा ठुबे (वय ३९) याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या छत्रपती संभाजीनगर विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले आहे.

शिंगणापूर येथे पुजा साहित्याची खरेदी करता भाविकांची वाहने ठराविक दुकानात लावण्यासाठी दोन महिन्यांचे मिळून तीन हजारांची मागणी या पोलीस कर्मचार्याने तक्रारदार गाळा मालकाकडे केली होती. याबाबत तक्रारदार गाळा मालकाने छत्रपती संभाजीनगर येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली. या तक्रारीवरून पथकाने १६ फेब्रुवारी रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता पोलिस कर्मचारी ठुबे याने लाचेची मागणी करत ती न दिल्यास खोटे गुन्हे दाखल करण्याची धमकी दिली. शनिशिंगणापूर पोलिस ठाण्याच्या शेजारी असलेल्या ग्रहराज नारळ सेंटरचे पार्किंग मध्ये तक्रारदार व पोलिस ठुबे यांच्यात ही चर्चा झाली आणि त्याने ३ हजार पैकी २ हजार लगेच आणि १ हजार नंतर स्विकारण्याची तयारी दर्शविली. त्यानंतर तक्रारदार हे ठुबे याला दोन हजार रुपये देत असताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने त्यास रंगेहाथ पकडले.

याबाबत पोलिस कर्मचारी अजय ठुबे याच्या वर शनि शिंगणापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अहिल्यानगर येथील पो.नि. राजू अल्हाट यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

## घरगुती गॅसची वाहनात अवैध रिफिलिंग करणाऱ्याला पकडले

नगर - शहरातील जुन्या महापालिकेजवळील बेग पटांगण परिसरात घरगुती गॅस टाक्यांमधून अनधिकृतपणे गॅस रिफिलिंगकरून लोकांच्या जीविताला धोका निर्माण करणाऱ्या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने रंगेहाथ पकडले. १६ फेब्रुवारी रोजी दुपारी १ च्या सुमारास ही कारवाई करण्यात आली. या कारवाईत पोलिसांनी १ लाख १७ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस हवालदार गणेश शिवाजी धोत्रे यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. त्यांच्या तक्रारीवरून आरोपी अरविंद वसंत वाघमारे (रा. संजय नगर, काटवन खंडोबा, अहिल्यानगर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १६ फेब्रुवारी रोजी दुपारी आरोपी मोकळ्या जागेत शेडच्या आडोशाला ओमनी गाडीमध्ये (क्र. एमएच १६ आर ४२८७) घरगुती गॅस टाक्यांतून बेकायदेशीररीत्या रिफिलिंग करत असताना पथकाने छापा टाकला.या छाप्यात पोलिसांनी १ लाख रुपयांची पांढऱ्या रंगाची ओमनी गाडी, इलेक्ट्रीक मोटार, कॉम्प्रेसर, वजन काटा आणि भारत व एचपी कंपनीच्या तीन गॅस टाक्या असा मुद्देमाल जप्त केला. सार्वजनिक ठिकाणी कोणत्याही परवान्याशिवाय गॅसची चोरी करून लोकांच्या जीवितास धोका निर्माण केल्याप्रकरणी भारतीय न्याय संहिता व जीवनावश्यक वस्तू कायद्यान्वये कारवाई करण्यात आली आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अनंत सालगुडे, पोलीस अंमलदार सुनिल पवार, शाहीद शेख, गणेश धोत्रे यांचे पथकाने ही कारवाई केली आहे.



घरगुती गॅसची वाहनात अवैध रिफिलिंग करणाऱ्याला पकडल्यानंतर त्याच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

## वरद फुलारी याचे अल्प आजाराने निधन



नगर - फुलारी मळा सावेडी रोड येथील रहिवासी वरद प्रशांत फुलारी (वय ८) यांचे अल्प आजाराने ९ फेब्रुवारी रोजी निधन झाले. त्याच्यावर राहत्या घरी अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, वडील, आजी, आजोबा, चुलते, चुलती असा परिवार आहे.

## केशरबाई वाघमारे यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर - येथील केशरबाई वाघमारे (वय ७७) यांचे अल्पशः आजाराने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात तीन मुले, चार मुली, सुना, जावई, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे. जय बजरंग हमाल मापाडी कामगार संघटनेचे चेअरमन व उत्कृष्ट जलतरणपटू स्व.रंभाजी बाबाजी वाघमारे यांच्या त्या पत्नी, स्वस्त धान्य दुकानदार भाऊसाहेब, राजेंद्र व संजय वाघमारे यांच्या मातोश्री होत.

## एमआयडीसी परिसरात वृद्धाचा खुन करणारा निघाला अल्पवयीन

नगर - एमआयडीसी परिसरात दाढी कटिंगसाठी घराबाहेर पडलेल्या वृध्द व्यक्तीचा निर्जन डोंगराळ भागात निर्घृण खून झाल्याची घटना उघडकीस आली असून या प्रकरणाचा अवघ्या २४ तासांत छडा लावण्यात एमआयडीसी पोलिसांना यश आले आहे. एका अल्पवयीन मुलाने हा खून केल्याचे निष्पन्न झाले असून त्याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

बापुराव नामदेव शिंदे (रा. मनोरमा कॉलनी, सह्याद्री चौक, एमआयडीसी) हे १३ फेब्रुवारी रोजी दाढी कटिंग करून येतो असे सांगून घरातून बाहेर पडले होते. मात्र, ते घरी परत न आल्याने त्यांच्या मुलगा मनोज बापुराव शिंदे यांनी १४ फेब्रुवारी रोजी एमआयडीसी पोलीस ठाण्यात मिसिंगची तक्रार दिली होती. दरम्यान, १४ फेब्रुवारी रोजी रात्री साईबन परिसरातील निर्जन डोंगराळ भागात एका वयोवृध्द व्यक्तीचा मृतदेह आढळून आला. चौकशीत तो मृतदेह बापुराव शिंदे यांचा असल्याचे निष्पन्न झाले. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तत्काळ खुनाचा गुन्हा दाखल केला. घटनेची माहिती मिळताच प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी यांनी तपासाची सूत्रे हाती घेतली.



एमआयडीसी परिसरात वृद्धाचा खुन करणाऱ्या आरोपीला पकडल्या नंतर गुन्ह्यात वापरलेल्या दुचाकीसह एमआयडीसी पोलिसांचे पथक.

तपास पथकाने परिसरातील सीसीटीव्ही फुटेज मोठ्या प्रमाणात संकलित करून त्याचे बारकाईने तांत्रिक विश्लेषण केले. घटनास्थळाजवळील हालचाली, संशयास्पद व्यक्तींची ओळख आणि त्यांच्या हालचालींचा मागोवा घेत सलग तपास करण्यात आला. तांत्रिक पुरावे आणि सीसीटीव्ही विश्लेषणाच्या आधारे एका अल्पवयीन मुलास ताब्यात घेण्यात आले. त्याच्या पालकांच्या उपस्थितीत सखोल चौकशी करण्यात आली. चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिल्याची माहिती पोलिसांनी दिली. सहाय्यक पोलिस निरीक्षक माणिक चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक विनोद परदेशी, उपनिरीक्षक मनोज मोंढे, उपनिरीक्षक विकास जाधव, अंमलदार राकेश खेडकर, राजू सुद्रीक, संदीप पवार, सचिन आडबल आदींच्या पथकाने ही कामगिरी केली.

# गृहिणी

## आरोग्य

### रोज प्या आल्याचा चहा

चहामध्ये आल्याचा वापर केल्याने त्याची चव तर वाढतेच पण त्याचे आरोग्यासाठीही खूप फायदे होतात. हे पचन सुधारण्यास, सर्दी-खोकल्यावर उपचार करण्यास आणि रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यास मदत करते. फायदे जाणून घ्या आल्याचा चहा पचन सुधारतो. यामुळे गॅस, अपचन आणि पोटदुखीपासून आराम मिळतो. आल्याचा चहा, विशेषतः सकाळी रिकाम्या पोटी घेतल्यास, पाचक एंजाइम सक्रिय करण्यास मदत होते. आल्याची चहा सर्दी, खोकला आणि फ्लूसाठी एक उत्तम घरगुती उपाय मानली जाते. त्यातील अँटीऑक्सिडंट्स शरीराला संसर्गाशी लढण्यास मदत करतात आणि नाक बंद होणे आणि कफ कमी करण्यास मदत करतात. आल्याची चहा घशातील खवखव कमी करते आणि कफ बाहेर काढण्यास मदत करते. यामुळे घशातील खवखव कमी होते. यामुळे रक्ताभिसरण देखील सुधारते, ज्यामुळे शरीराच्या अवयवांना पोषक तत्वांचा योग्य पुरवठा होतो. आल्यामध्ये असलेले अँटी-इंफ्लेमेटरी आणि अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करतात, ज्यामुळे शरीराला रोगांशी चांगल्या प्रकारे लढण्यास मदत होते. आल्याचा चहा दिवसातून २ ते ३ कप पिऊ शकता. तथापि, जर एखाद्याला गॅस, छातीत जळजळ किंवा पोटाच्या इतर समस्या असतील तर ते कमी प्रमाणात प्यावे.

## पाककला

### आंबा लाडू

**साहित्य :** अर्धा कप आंब्याचा पल्प, अर्धा काप कंडेस्ड मिल्क, एक कप नारळाचा किस, एक चमचा वेलची पूड, अर्धा कप वाळलेला सुकामेवा

**कृती :** एका पॅनमध्ये नारळाचा किस टाकून भाजून घ्यावा. यानंतर त्यामध्ये आंब्याचा गुदा, कंडेस्ड मिल्क, सुखा मेवा, वेलची पूड चांगल्याप्रकारे मिक्स करावी. व परतवावे जेणे करून थोडे घट्ट होईल. आता हे मिश्रण थंड झाल्यानंतर हात तूप लावून याला लाडूचा आकार द्यावा. आता एका ताटलीत नारळाचा किस टाकून हे लाडू ठेवावे.

## वास्तू

### चांगल्या आरोग्यासाठी

* तुमच्या बेड स्टोरेज बॉक्समध्ये कधीही इलेक्ट्रॉनिक उपकरणे ठेवू नका, कारण यामुळे हृदयाच्या समस्या आणि मानसिक अस्थिरता निर्माण होते.

* कुटुंबाचे आरोग्य चांगले राहण्यासाठी तुमच्या घराचा ईशान्य भाग नेहमी गोंधळमुक्त ठेवण्याची खात्री करा. तसेच या दिशेला जड वस्तू ठेवणे टाळावे.

* किचन आणि टॉयलेटमध्ये काही अंतर असले पाहिजे कारण ही ऊर्जा दुसऱ्याशी भिडते.

* तुमचे शयनकक्ष ईशान्य दिशेला ठेवू नका, कारण यामुळे गंभीर आरोग्य समस्या उद्भवू शकतात.

## सौंदर्य

* दही आणि कॉफी पावडरने स्क्रब करा, यामुळे डेड स्किन निघून जाते, त्वचा मऊ होते.

* चंदन पावडर, दही आणि मुलतानी मातीचा फेस पॅक वापरून त्वचा उजळ करा.

## सल्ला

तुमच्या राहत्या जागेत गडद नीलमणी आणि अंबर रंगांच्या आकर्षक मिश्रणाने एक गडद, नाट्यमय वातावरण तयार करा. भिंतीच्या मध्यभागी असलेल्या भागावर गडद नीलमणी लावली जाते, दोन्ही बाजूंनी अंबर रंगाने वेढलेला असतो. भिंतींच्या रंगांची समृद्धता संतुलित करण्यासाठी, तुम्ही फर्निचरसाठी तटस्थ छटा निवडू शकता.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

बुधवार, दि. १८ फेब्रुवारी २०२६

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, फाल्गुन शुक्लपक्ष, शततारा २१।१६, सूर्योदय ०६ वा. ३८ मि. सूर्यास्त ०५ वा. ३१ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : पैसा खर्च होईल. संतती बरोबर मतभेद किंवा त्यांच्या चिंतेत मन व्यग्र राहील. सामाजिक क्षेत्रात अपयश येणार नाही याकडे लक्ष द्या.

**वृषभ** : नवीन कामाची सुरूवात करण्याला अनुकूल दिवस. मित्रांबरोबर दिवस आनंदात घालवाल. मागील देणी वसुल होतील.

**मिथुन** : विद्यार्थ्यांना आज अभ्यासात रस वाटणार नाही. शेअर्समध्ये गुंतवणूक करू शकाल. आध्यात्मिकतेतून शांती मिळेल.

**कर्क** : मित्र आणि कुटुंबीय यांच्याबरोबर आनंदात दिवस घालवाल. प्रवास, सहली यातूनही आज आनंद मिळवू शकता.

**सिंह** : आध्यात्मिकतेच्या मदतीने विचारातील नकारात्मकता दूर करा. मनाच्या एकाग्रतेमुळे सर्व कामात फायदा होईल.

**कन्या** : स्वकीयांचा वियोग घडू शकतो. कुटुंबातील लोकांशी मतभेद संभवतात. मिळणाऱ्या फायद्यात नुकसान होणार नाही याकडे लक्ष द्या.

**तूळ** : देण्या-घेण्याचे निर्णय विचारपूर्वक घ्या. अपघात व गैरसमज यापासून दूरच राहा. वाहने सावकाश चालवावीत.

**वृश्चिक** : शारीरिकस्वास्थ्य बिघडू शकते. विनाकारण खर्च होईल. मागील उधारी उसनवारी वसुल होईल.


**धनु** : आज अध्यात्माकडे कल राहिल. जुने मित्र व नातेवाईक यांच्या सहवासामुळे दिवस आनंदात व्यतीत होईल. तब्येत सांभाळा.

**मकर** : उतावीळ स्वभावावर नियंत्रण ठेवून कार्ये शांततेत केल्यास आजचा दिवस हा यशदायी ठरेल. उधारी वसुल होईल.

**कुंभ** : हितशत्रुंपासून पिडा संभवते. संततीसौख्य लाभेल. कोर्ट-कचेरी आदी गोष्टींपासून लांब रहा.

**मीन** : आर्थिक व्यवहार करताना अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवू नका. मागील उधारी वसूल होईल.

# शब्दगंध क्र. ७३६९ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) प्रेम; माया ४) मनातील विचार; मानसिकता ७) प्रश्नोत्तर ९) महिना; माह ११) जखम; व्रण १२) अरबी देव १३) तारका; चांदणी १५) साधारण दोन मैल अंतराचे पूर्वीचे लांबीचे एक परिमाण १७) धुंद; लट्ठ; विपुल १८) गोंद वगैरे चिकट पदार्थ २१) काळजी; देखभाल; जोपासना २२) आशय; हेतू; स्वार्थ २५) एक शेंगभाजी २७) माणसांतील श्रेष्ठ २८) देवांचा राजा; इंद्र

**उभे शब्द :-** १) अंदाज; तर्क; अटकळ २) ढीग; चवड; चळत ३) खिडकी; वातायन; झरोका ४) मद; कफ; धुंदी ५) पलंग विणण्याची कापडी पट्टी ६) निमित्त; कारण ८) कितीही सांगितले तरी पुन्हा पुन्हा तीच चूक करणारा; निलाजरा १०) कार्यक्षम ; काम करण्यास योग्य १४) त्रासलेला; दुःखी-कष्टी १६) पाढ्यातील सहाची संज्ञा १९) अरण्यातील वास्तव्य २०) फूल; पुष्प २१) कडक; निबर २३) 'जर'चा जोडीदार; त्याअर्थी २४) अंगावरील बारीक केस; रोम २५) एक जंगली प्राणी; रानरेडा २६) आवाज; ध्वनी; नाद

### शब्दगंध क्र. ७३६८ चे उत्तर



# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** पुस्तक असो वा आयुष्य शेवट पर्यंत संयम ठेवायचा असतो कारण कहाणी शेवटच्या पानात सुद्धा बदलू शकते.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### मध दीर्घ काळ कसे टिकते? खराब का होत नाही?

मधाला अमर पदार्थ का मानलं जातं, यामागचं शास्त्र खूप रंजक आहे. हजारो वर्षांपूर्वी इजिप्शियन पिरॅमिड्समध्ये सापडलेला मध आजही खाण्यायोग्य स्थितीत आढळला आहे. वर्षानुवर्षे मध खराब न होण्यामागे ही ४ प्रमुख वैज्ञानिक कारणे आहेत:

मधात पाण्याचे प्रमाण केवळ १७-१८% असते. नैसर्गिकरित्या मध हा खूप 'हायग्रोस्कोपिक' असतो, म्हणजेच तो आर्द्रता शोषून घेतो पण स्वतःमध्ये पाणी टिकवून धरत नाही. कोणत्याही जीवाणूंना जगण्यासाठी पाण्याची गरज असते; मधात पाणीच नसल्यामुळे तिथे जीवाणूंची वाढ होऊ शकत नाही.

मधाचा पीएच साधारणपणे ३.२ ते ४.५ च्या दरम्यान असतो. हे प्रमाण बऱ्यापैकी आम्लयुक्त आहे. इतक्या जास्त सिडिक वातावरणात कोणतेही सूक्ष्मजीव किंवा बॅक्टेरिया जिवंत राहू शकत नाहीत.

मधमाश्या जेव्हा फुलांतील रस गोळा करतात, तेव्हा त्यांच्या पोटातील ग्लुकोज ऑक्सिडेज नावाचे एन्झाइम त्या रसात मिसळते. जेव्हा या रसाचे रूपांतर मधात होते, तेव्हा या एन्झाइममुळे 'हायड्रोजन पेरोक्साईड' तयार होते. हे एक नैसर्गिक जंतुनाशक आहे, जे मधाला खराब होण्यापासून वाचवते.

मधमाश्या जेव्हा मधाच्या पोळ्यावर पंख फडफडावतात, तेव्हा त्यातील उरलेलं पाणीही बाष्पीभवनाने उडून जातं. यामुळे मध अधिक दाट आणि टिकण्यायोग्य बनतो.

जर तुमच्या मधात साखरेसारखे खडे झाले, तर त्याचा अर्थ मध खराब झाला असा होत नाही. हे मधाच्या नैसर्गिक गुणधर्मामुळे होते. कोमट पाण्यात मधाची बरणी ठेवल्यास तो पुन्हा पूर्वीसारखा होतो.

जर मधाची बरणी उघडी ठेवली आणि त्यात ओलावा शिरला, तर मात्र मध खराब होऊ शकतो. त्यामुळे तो नेहमी हवाबंद डब्यात ठेवावा.

### बुद्धिमान भिकारी

एकदा दोन संन्यासी एका आश्रमात राहत होते. प्रार्थनेनंतर ते जेवायला निघाले होते, तेव्हा एक भिकारी तिथे आला. भिकारी त्यांच्याकडून अन्न मागू लागला. संन्यासींनी त्याला अन्न देण्यास नकार दिला.

भिकारी म्हणाला, हे संन्यासी, तुम्ही कोणाची पूजा करता? संन्यासी म्हणाले, आम्ही पवन देवाची पूजा करतो. तो जीवन आहे. त्यानंतर भिकारीने विचारले, तुम्ही जेवण्यापूर्वी कोणाला अन्न अर्पण करता? ते म्हणाले, आम्ही पवन देवाला अन्न अर्पण करतो.


यावर भिकारी म्हणाला, हे संन्यासी, तुम्हाला माहित असले पाहिजे की सर्व प्राण्यांमध्ये जीवन आहे.

संन्यासी म्हणाले, अगदी, आम्हाला हे चांगलेच माहित आहे.

यावर भिकारी म्हणाला, मला अन्न देण्यास नकार देऊन तुम्ही माझ्या आत असलेल्या जीवनाला अन्न अर्पण करण्यास नकार देत आहात, तर तुम्ही जीवनासाठी अन्न तयार केले आहे. संन्यासी भिकारीचे शांतपणे ऐकत राहिले. त्याला त्यांच्या अज्ञानाची खूप लाज वाटली. त्यांनी भिकारीला अन्न दिले.

तात्पर्य : नेहमी सर्वांना मदत करावी; गरजूंना अन्नदान करावे.

## जीवन का अमृत (भाग १)



भी और इसके बाद भी, दे रहें हैं। आपको सलाह दी जाती है कि ऐसे मौकों पर आप सिद्ध नामों का जाप करें। यदि स्वरूप आपके सामने ठहरता है, तो पक्की तौर से जान लें कि वह आपका दोस्त है और परलोक के रहस्यों की यात्रा में आपका सहायक होगा।

ऊपर से आती घंटियों, शंख या बाँसुरी की पवित्र शब्द-धुन ठीक है और इसे एकाग्रता से सुनना चाहिए। ये आपके सिर पर कार्यरत और सदा आपके साथ रहने वाली गुरु-शक्ति के अनूठे वरदान हैं।

१. गुरुओं की विविधता के इस जमाने में, जहाँ साधारण इंसान के लिए सही और गलत में फर्क करना मुश्किल है, यह जरूरी सा हो जाता है कि सही वस्तु की पहचान के लिए कुछ खास-खास संकेत हों।

### सातवी मंजिल

एक पूर्ण सत्गुरु को जानना और पहचानना मुश्किल है। इमारत की सातवीं मंजिल पर रहने वाले इंसान को केवल उसी मंजिल पर रहने वाला इंसान ही देख और पहचान सकता है।

यदि हम अंतर्मुख होकर, खुद सत्गुरु की दया और महानता को कार्य करता देखें और देखें कि कैसे वह इंसानियत की सहायता कर रहा है, तो हम उसे कुछ थोड़ा सा समझ सकते हैं। इस प्रत्यक्ष अनुभव से हमें दृढ़ विश्वास हो जाएगा, पर जब तक ऐसा नहीं होता, हम पुराने महापुरुषों द्वारा बताई गई कसौटियों को, जो संक्षेप में यहाँ दी गई हैं, प्रयोग कर सकते हैं और किसी नतीजे पर पहुंचने के लिए उन्हें ध्यान में रख सकते हैं।

(१) गुरु को, अपनी व्यक्तिगत जरूरतों के लिए, शिष्यों के भिक्षादान पर निर्भर नहीं होना चाहिए, बल्कि अपनी ईमानदारी की कमाई पर गुजारा करना चाहिए।

(२) वह कामिल (समर्थ) हो और पहली बैठक में ही अंतर की आँख खोल सकें और प्रभु की ज्योति और शब्द का कुछ अनुभव दे सके, जिसे

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

सहस्त्रार चक्र के जाग्रत होने पर एक प्रकार का आणविक विस्फोट जैसा बल उत्पन्न होता है। अगर शरीर कमजोर होगा तो वह इस बल को सहन नहीं कर पायेगा। इस के लिये शरीर को शक्तिशाली बनाओ, उसमें रोग ना हो, कमजोरी ना हो।

दिव्य रसायनिक औषधियों से तथा भोजन, आसनों आदि से शरीर को शक्तिशाली बना लेना चाहिये।

सहस्त्रार - ६

सहस्त्रार चक्र बहुत शक्तिशाली चक्र है। इसके जागृत होने पर हम आत्मा, परमात्मा और प्रकृति का भेद जान जाते हैं। इस लिये इस चक्र को कोई बिरला ही जागृत कर पाता है। कमांडो वही व्यक्ति बन सकता है जो निरोगी हो उसका हरेक अंग स्वस्थ हो। उसके हाथ पैर, नाक, कान, मुख, पेट, हृदय आदि स्वस्थ हों। सहस्त्रार चक्र तभी जागृत होगा जब सारे शक्ति केन्द्र जागृत हों और सभी शक्ति चक्र जागृत हैं उसकी निशानी यह है कि उस के

### जागृती स्थिती

शरीर में कोई रोग ना हो। मोटे तौर पर समझ लो शरीर के किसी अंग में कोई रोग है तो उसके सामने वाली रीढ़ की हड्डी के मनके में जो शक्ति केन्द्र है वह अभी तक जागृत नहीं है।

अगर व्यक्ति को बवासीर है कब्ज है या नाजुक कर्म इन्द्रियों से सम्बन्धित कोई और रोग हैं तो समझो अभी पहला केन्द्र जागृत नहीं है। अगर व्यक्ति को पीलिया, बहुमूत्र, मधुमेह है, गुर्दे, लीवर आदि का रोग है तो समझो अभी तक दूसरा केन्द्र जागृत नहीं है। अगर कोई चर्म रोग है तो समझो अभी तक तीसरा नाभि चक्र जागृत नहीं है।

अगर हृदय रोग, गठिया रोग, जोडो का दर्द है तो समझो चौथा चक्र (हृदय) अभी तक अस्त व्यस्त है। कैंसर, नासूर, थायराइड या कोई अन्य घातक रोग है तो समझो ५वां विशुद्धि (कंठ) चक्र अभी कमजोर है। अगर व्यक्ति पागल है, उन्मादी है तो समझो सहस्त्रार चक्र बहुत ही डावांडोल है। इन सभी चक्रों को जागृत करने की विधि वही है जो हम आज्ञा चक्र को जागृत करने लिये अपनाते हैं।

हर चक्र पर ध्यान लगाओ और वहां बिंदु रूप में प्रकाश देखो। इसे ही आत्मा की तरह समझ कर भगवान को याद करो और सूक्ष्म किरणें देते रहो तभी ये केन्द्र जागृत होंगें नहीं तो कोई ना कोई चक्र बिगड़ता रहेगा।

रविवार के दिन पहले चक्र पर, सोमवार के दिन दूसरे चक्र, मंगलवार के दिन तीसरे चक्र पर, बुधवार के दिन चौथे चक्र पर, वीरवार के दिन ५वें चक्र, शुक्रवार के दिन ६वें चक्र और शनिवार के दिन ७वें चक्र पर ध्यान लगाओ। सारा दिन जब भी याद आए उसी एक चक्र पर ध्यान लगावें जो आप ने निश्चित कर रखा है। बस उस शक्ति केन्द्र को आत्मा की तरह बिंदु प्रकाश समझ करे

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

एक प्रेगनंट बाई पुरुष डॉक्टर कडे जाते

डॉक्टर : काय बाई, कितवा महिना ?

बाई (लाजून) : इश्य !, आठवा

डॉक्टर (आणखी लाजून) : अहो, मी कसा आठवू? तुम्हीच आठवा !

## करूया स्पर्धा परिक्षांची तयारी

* भारताच्या पंकज अडवाणीने कितवे अशियाई स्नूकर (बिलियर्डस्) स्पर्धेचे विजेतेपद पटकावले आहे? - १४ व्या

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

* पिकलेले अननस जसे पित्त कमी करते, त्याच्या विरुद्ध कच्चे अननस हे पित्तकारक असते. त्यामधील ब्रोमेलाईन हे एन्झाईम अन्नपचनास मदत करते. त्यामुळे कच्चे अननस हे रुचकर, हृदय, ग्लानीनाशक आणि श्रमहारक असते.

* क्षार धर्मीय, खनिजसंपन्न अशा अननसाम ध्ये 'क' जीवनसत्त्व, पोटॅशियम, ब्रोमोलिन, कॅरोटीन हे घटक असतात. त्यामुळे काही त्वचारोगांवर अननसाचा रस नियमितपणे सेवन केला असता त्वचारोग बरे होतात, तसेच ते श्रमनाशक असते.

* लहान मुलांना जर ज्वर (ताप) आला असेल, तर तो कमी करण्यासाठी अननसाचा रस व पिंपळीचूर्ण मधामधून चाटवयास द्यावे.

* पित्ताचे विकार कमी करण्यासाठी अननसाचा मुरांबा, तसेच अननस सरबत यांचा आहारामध्ये नियमित वापर करावा.

* पिकलेल्या अननसाचे काप त्यात पिंपळीचूर्ण व मिरे घालून खाल्ले, तर आम्लपित्त व बहुमूत्रता हे विकार कमी होतात.

* अननसाचे सरबत हे हृदयाचे आरोग्य चांगले राखण्यासाठी उपयुक्त असते. या सरबतामुळे हृदय सुदृढ बनते आणि मन उत्साही राहते.

* अननसापासून मुरांबा, सरबत असे पदार्थ बनवून वर्षभर अननसाचा आहारात वापर करावा.

### अननस

सावधानता : गर्भावस्थेत अननस खाऊ नये, कारण त्यातील ब्रोमेलिन व ट्रिप्सीन हे घटक गर्भस्थ बाळासाठी हानिकारक असतात. अननसाचा रस किंवा काप खाल्ल्यास गर्भाशयाचे आकुंचन होऊन कळा सुरु होऊ शकतात. त्यामुळे अकाली प्रसूती होण्याची शक्यता असते. अननसाच्या अति सेवनाने पचन बिघडून पोटाचे विकार होऊ शकतात. कच्चे अननस अति प्रमाणात खाल्ल्यास पचनक्रिया बिघडून जुलाब होतात. तसेच कच्च्या अननसाच्या सेवनाने जिभेला कातरे पडतात.

मोदकाच्या आकाराचे अंजीर हे फळ सर्वांनाच परिचित आहे. शक्तिवर्धक, वातशामक, सारक असे अंजीर आहारामध्ये, तसेच औषधीमध्येही उपयुक्त आहे. मराठीत 'अंजीर', हिंदीमध्ये 'अंजीर', इंग्रजीमध्ये 'फिग', तर शास्त्रीय भाषेत 'फायकस कॅरिका' या नावाने अंजीर ओळखले जाते. अंजीर हे 'मोरेसी' कुळातील आहे.

अंजीर हे फळ ताजे व सुके अशा दोन प्रकारांत उपलब्ध असून, ते उंबराच्या जातीचे फळ आहे. अंजिराचा आकार व आतील गरही उंबराच्या फळासारखाच असतो व झाडही उंबरासारखेच 'क्षीरी' प्रकारातील असते. अंजिराची झाडे विशेषतः उष्ण प्रदेशात असतात. कारण त्याला उष्ण हवामान मानवते. भारतात काश्मीर, पुणे, नाशिक, उत्तर प्रदेश, बंगळुरु, म्हैसूर, गुजरातमध्ये अंजिराचे उत्पादन घेतले जाते. औषधी गुणधर्म :

आयुर्वेदानुसार : अंजीर शीत गुणात्मक, मधुर व पचनास जड असते. ते पित्त विकार आणि वात व कफ विकार दूर करते. अंजीर मधुर रसाचे विपाकाशी मधुर, शीतवीर्य व सारक असते. ताजे अंजीर हे सुक्या अंजिरापेक्षा जास्त पौष्टिक असते. अंजिराच्या अनेक जाती आहेत. गुलाबी, लाल, काळी, पांढरी, लहान, मोठी, तुर्की अशा अनेक जातींमध्ये अंजीर उपलब्ध असते.

आधुनिक शास्त्रानुसार : अंजिराच्या फळामध्ये आर्द्रता, पिष्टमय पदार्थ, प्रथिने, मेद, कर्बोदके, कॅल्शिअम, फॉस्फरस, लोह, तंतुमय पदार्थ, 'अ' व 'क' जीवनसत्त्व भरपूर प्रमाणात असते.

(क्रमशः)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००

# राज्यस्तरीय सब ज्युनिअर मैदानी स्पर्धेत मुंबई उपनगर चॅम्पियन; ठाणे संघाने पटकावले उपविजेतेपद; दोन हजार खेळाडूंचा सहभाग

### अहिल्यानगर जिल्ह्याचे राज्यस्तरीय सब ज्युनिअर मैदानी स्पर्धेचे उत्कृष्ट आयोजन

नगर – अहमदनगर जिल्हा अॅथलेटिक्स असोसिएशनच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय सब ज्युनिअर मैदानी स्पर्धेत मुंबई उपनगरने सर्वसाधारण विजेतेपद पटकावले तर ठाणे संघाने उपविजेतेपद पटकावले. कोपरगाव येथील एस.एस.जी.एम. कॉलेजच्या मैदानावर या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. राज्याच्या विविध जिल्ह्यांतून आलेल्या लहानग्या खेळाडूंनी आपल्या कौशल्याचे दर्शन घडवत स्पर्धेत रंगत आणली.

या स्पर्धेचा समारोप प्राचार्य डॉ. माधव सरोदे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र राज्य अॅथलेटिक्स असोसिएशनचे सचिव सतीश उचिल, अहमदनगर जिल्हा अॅथलेटिक्स असोसिएशनचे अध्यक्ष व शिवछत्रपती पुरस्कारार्थी प्रा. सुनिल जाधव, कार्याध्यक्ष रंगनाथ डागवाले, शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त अरूण यशवंत चंद्रे, आयोजन समितीचे सचिव व जिल्हा संघटनेचे सचिव दिनेश भालेराव, राज्य स्पर्धेचे तांत्रिक अधिकारी राकेश सावे, चंद्रकांत पाटील, जिल्हा संघटनेचे श्रीरामसेतु आवारी, संदीप घावटे, अजित पवार, धनंजय देवकर, जगन गवांदे, नितीन निकम व जिल्हा संघटनेचे पदाधिकारी व कोपरगाव तालुका क्रीडा शिक्षक व पदाधिकारी यांच्यासह खेळाडू, प्रशिक्षक व पालक उपस्थित होते.


अहमदनगर जिल्हा अॅथलेटिक्स असोसिएशनच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय सब ज्युनिअर मैदानी स्पर्धेत मुंबई उपनगरने सर्वसाधारण विजेतेपद पटकावले तर ठाणे संघाने उपविजेतेपद पटकावले. कोपरगाव येथील एस.एस.जी.एम. कॉलेजच्या मैदानावर या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेत ८, १०, १२ व १४ वर्ष वयोगटातील खेळाडूंसाठी धावणे, गोळा फेक, लांब उडी, रिले या क्रीडा प्रकारांचा समावेश होता. यात खेळाडूंनी सहभाग नोंदविला. संपूर्ण मैदान खेळाडू, प्रशिक्षक व प्रेक्षकांनी गजबजून गेले होते. यावेळी दिनेश भालेराव यांनी स्पर्धेच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट करताना सांगितले की, या स्पर्धेचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे आंतरराष्ट्रीय दर्जाचा फोटो फिनिश कॅमेरा हा दिल्लीवरून मागून घेण्यात आला होता. राष्ट्रीतस्तरावरील खेळाडू घडण्यासाठी नवोदित खेळाडूंचा चालना दिली जात आहे. लहान वयोगटातच मुला–मुलींना योग्य संधी व व्यासपीठ मिळाल्यास त्यांच्यातील क्रीडा गुणांना दिशा मिळते. जिल्हा व राज्य पातळीवरील अशा स्पर्धांमधूनच भविष्यातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू घडत असल्याचे ते म्हणाले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र कोहकडे यांनी केले. यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थितांनी आयोजन समितीचे कौतुक केले. या स्पर्धेमुळे ग्रामीण व शहरी भागातील उदयोन्मुख खेळाडूंना राज्यस्तरावर आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी मिळाल्याची भावना उपस्थित पालक व क्रीडाप्रेमींनी व्यक्त केली .

सबज्युनिअर मैदानी स्पर्धा ही भारतातील एकमेव महाराष्ट्र राज्यात आयोजित केली जात असून, जिल्हा संघटनेचे अध्यक्ष प्रा. सुनील जाधव व सचिव दिनेश भालेराव यांच्या नेतृत्वाखाली अहिल्यानगर जिल्ह्याने अतिशय उत्तम प्रकारचे आयोजन करून अप्रतिम अशा स्पर्धा केल्या, असे सतीश उचिल म्हणाले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## माझे जीवीची आवडी

वारकरी वैष्णव हे विठ्ठलाच्या सगुण दर्शनाचे प्रेमसुख पंढरीच्या वारीत येऊन वारंवार अनुभवतात. अनुभवामृताच्या प्रेमसागरात विहरण्याचा आनंद ज्ञानेश्वर माउलींनी सर्व ज्ञान आणि योग गिळून तत्परतेने घेतला आणि तो सर्वांनी कसा घ्यावा हे विठ्ठलाच्या वारीच्या रूपाने शिकविले. प्रेमच प्रेमाची अनुभूती घेऊ शकत नाही पण इथे प्रेमानुभवच प्रेमाच्या सहवासाने सुखावतो आणि प्रेमच प्रेमाला साठवीत चालू लागते. ह्या प्रेमाची पताका खांद्यावर मिरवीत नाचू लागतात.

माझे जीवीची आवडी ।
पंढरपुरा नेई गुढी ।
पांडुरंगी मन रंगले।
गोविंदाचे गुणी वेधले।

ह्या आर्त ओढीने ते पांडुरंगाची भेट घेतात आणि अद्वैत आनंदाची अनुभूती येण्यासाठीचा हा मार्ग इतरांनाही दाखवतात.

संतसंगती हे पंढरीच्या वारीचे एक मोठे प्रयोजन आहे. सतसंगती लाभते आणि प्रकृतीच संस्कृतीकडे झेपावते. जीवनसाफल्य ही परम ार्थाची खरी प्रेरणा असून आर्ताला दुःखनाशाने, जिज्ञासूला जिज्ञासापूर्तीने आणि भक्ताला प्रेमभक्तिने जीवनाची सफलताच गाठायची आहे. मानवी जीवनातील अपूर्णता, दोषमयता, मनुष्याची सदाचाराकडे असणारी स्वाभाविक प्रवृत्ती, या व्यापक जनविश्वात आपल्या थिटेपणाची जाणीव, विश्वाची विशालता आणि नियमबद्धता यांचा जिज्ञासू भूमिकेतून अर्थ शोधल्याशिवाय परमार्थाची वाट सापडू शकत नाही. संत एकनाथ महाराज सांगतात.

चालता मारगी फुटतसे वाट ।
मग तो बोभाट सहजी होय ।।
नोहे गुंतागुंत चुकीचा बोभाटा ।।
मार्ग आहे नीट संतसंग ।।

इतर मार्गावरून चालताना मध्येच एखादी वाट फुटली तर साहजिकच बोभाटा होऊन वाटसरू गोंधळून जातो. नाथम हाराज म्हणतात, संतांनी दाखविलेला वारीचा मार्ग तसा नाही. त्यावर पूर्वीपासून अनेकजण चालत आले आहेत. त्यात कोठेही गुंतागुंत नाही. वाट चुकण्याची भीती नाही. सत्संगाचा हा मार्ग नीट आहे. ज्ञानेश्वर माउली म्हणतात,

पाठी महर्षि येणे आले।
साधकाचे सिद्ध झाले।।
आत्मविद् थोरावले । येणेचि पंथे ।।

याच मार्गावर महर्षी आले, साधक मार्गावर स्थिरावले, मार्ग स्वच्छ आहे, शुद्ध आहे, निर्मळ आहे.

– किशोर गांधी

# १०० व्या विभागीय नाट्य संमेलन वर्षपूर्तीनिमित्त १८ फेब्रुवारी रोजी 'एकदा पाहावं करून' नाटक

### नगरच्या नाट्यर सिकांसाठी विनामूल्य सांस्कृतिक मेजवानी; अहिल्यानगर उपनगर शाखेचा उपक्रम

नगर – अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, अहिल्यानगर उपनगर शाखेच्या वतीने १०० व्या विभागीय नाट्य संमेलनाच्या वर्षपूर्ती निमित्त 'एकदा पाहावं करून' या नाटकाचा विशेष प्रयोग आयोजित करण्यात आला आहे. नगरच्या नाट्यरसिक प्रेक्षकांसाठी हा कार्यक्रम विनामूल्य ठेवण्यात आला असून सांस्कृतिक मेजवानीचा आनंद घेण्याची संधी उपलब्ध होणार आहे. हा नाट्यप्रयोग १८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७.३० वाजता सावेडी, अहिल्यानगर येथील माऊली सभागृह येथे रंगणार आहे. मराठी रंगभूमीच्या समृद्ध परंपरेचा गौरव आणि नाट्यसंस्कृतीला चालना देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत असल्याची माहिती संमेलनाचे स्वागताध्यक्ष डॉ. बापूसाहेब कांडेकर यांनी दिली.

या कार्यक्रमासाठी संमेलनाचे निमंत्रक आमदार संग्राम जगताप, महापौर सौ. ज्योती गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, मनपा आयुक्त यशवंत डांगे, संमेलन प्रमुख क्षितिज झावरे, मध्यवर्ती कोषाध्यक्ष सतीश लोटके उपस्थित राहणार आहेत.

'एकदा पाहावं करून' हे नाटक मराठी रंगभूमीवरील लोकप्रिय नाटकांपैकी एक असून प्रभावी कथानक आणि दमदार अभिनयामुळे प्रेक्षकांसाठी विशेष आकर्षण ठरणार आहे. उपनगर शाखेच्या 'मस्त नाटक योजनेतील' सदस्यांसाठी राखीव जागांची व्यवस्था करण्यात आली आहे. अशी माहिती शाखेचे अध्यक्ष प्रसाद बेडेकर यांनी दिली.

या प्रसंगी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, अहिल्यानगर उपनगर शाखेच्या नूतन कार्यकारिणीचा सत्कार व पदग्रहण समारंभ तसेच स्वागत समारंभ देखील आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाचा लाभ घेण्यासाठी नाट्यरसिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# लंडन किडस्च्या शालेय विद्यार्थ्यांनी केली सहलीत धमाल

नगर – केडगाव येथील ज्ञानसाधना बहुउद्देशीय व सेवाभावी संस्था संचलित लंडन किडस् प्री स्कूलची शैक्षणिक सहल आनंदबन येथे नेण्यात आली होती. एक दिवसीय सहलीत विद्यार्थ्यांनी निसर्गरम्य परिसराला भेट देवून सहलीचा मनमुराद आनंद लुटला.

शाळेच्या प्राचार्या रुचिता जमदाडे म्हणाल्या की, चार ते सहा या वयोगटातील मुलांची सहल जामखेड रोडवरील आनंदबन या ठिकाणी घेऊन आलो असता, उत्साहात चिमुकल्यांचे ढोल ताशा वाजून स्वागत करण्यात आले. निसर्गमय परिसराची पहाणी करुन परिसरातील विविध गोष्टींची माहिती त्यांना देण्यात आली. शालेय विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच प्रत्यक्ष निसर्गरम्य परिसराची भेट घडविण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.


केडगाव येथील ज्ञानसाधना बहुउद्देशीय व सेवाभावी संस्था संचलित लंडन किडस् प्री स्कूलची शैक्षणिक सहल आनंदबन येथे नेण्यात आली होती. एक दिवसीय सहलीत विद्यार्थ्यांनी निसर्गरम्य परिसराला भेट देवून सहलीचा आनंद लुटला.

### पुस्तकी ज्ञानाबरोबरच प्रत्यक्ष निसर्गरम्य परिसराची भेट

मुलांनी रेन डान्स, वॉटर पार्क, बैलगाडा राईड, उंटावरून सवारी, रेल्वेची फेरी, मॅजिक शो, कटपुतली शो, बॉम्बे सर्कस, रस्सीखेच, उंचउडी अशा वेगवेगळ्या खेळ व उपक्रमांचा आनंद घेतला. सुंदर व प्रसन्न अशा वातावरणात मुलांचा आनंद द्विगुणीत झाला होता. विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला.

यावेळी आनंदबनचे संचालक मंगेश बेरड व अक्षय भळगट यांनी सहलीचे स्वागत करुन सोयी–सुविधांची माहिती दिली. सहल यशस्वी करण्यासाठी लंडन किडस्च्या शिक्षिका कल्याणी शिंदे, सपना साबळे, जयश्री साठे, प्रतीक्षा शिंदे, स्वप्नाली ताजने, पूर्वा ढोरसकर, नक्षत्रा ढोरसकर, ज्ञानसाधना गुरुकुलचे संचालक प्रा. प्रसाद जमदाडे, गोंदके मावशी, वाळेकर मावशी यांनी परिश्रम घेतले.

# किडस् इरा किडस् प्री स्कूलमध्ये शिक्षणाचा पाया होतो भक्कम

### प्राध्यापक श्रीकांत सोनटक्के यांचे उद्गार, विविध कला गुणांच्या सादरीकरणाने स्नेहसंमेलन उत्साहात, उत्कर्ष शिंदे, सानवी वाघमारे ठरले बेस्ट ऑल राऊंडर स्टुडन्ट

नगर – लाफ लर्न अॅण्ड लीड या ब्रीदवाक्यानुसार कार्यरत इरा किडस् प्री स्कूल मध्ये बालवयातच मुलांच्या शिक्षणाचा पाया भक्कम करून घेतला जातो. त्यामुळे चांगली पिढी घडते व्यक्तिमत्व विकसित मुले समाजाला मिळतात. असे उद्गार प्राध्यापक श्रीकांत सोनटक्के यांनी काढले

बोल्हेगाव येथील इरा किडस् प्री स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. विद्यालयाच्या प्रांगणात हा सोहळा आयोजित करण्यात आला होता. प्रमुख पाहुणे म्हणून प्राध्यापक श्रीकांत सोनटक्के उपस्थित होते. स्कूलचे संचालक रमेश साळुंके, स्कूलच्या प्रिन्सिपल्स अर्चना साळुंके, जयश्री सोनटक्के, प्रसन्न साळुंके, गौरी साळुंके आदी उपस्थित होते.

यावर्षी उत्कर्ष शिंदे आणि सान्वी वाघमारे हे बेस्ट ऑल राऊंडर स्टुडन्ट ठरले. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्राध्यापक सोनटक्के पुढे म्हणाले की अहिल्यानगर शहरात इरा प्री स्कूल लाफ लर्न अॅण्ड लीड या ब्रीदवाक्यानुसार कार्यरत असून मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांच्या शिक्षणाचा आणि व्यक्तिमत्व विकासाचा पाया मजबूत करण्यासाठी कटिबद्ध आहे. मुलांना लहानपणापासून वाचन चिंतन मननाची गोडी लावणे ही खूप आवश्यक बाब असते. इरा किडस् प्री स्कूलमध्ये त्यांना अक्षर ओळख करून देताना वेगवेगळ्या खेळांचा गाणी गोष्टी यांचा वापर केला जातो. हे स्कूल एक प्रयोगशील कार्य शाळेचे रूप आहे. विद्यालयाचे अध्यापक आपल्या संकल्पनेतून शास्त्रीय पद्धतीने मुलांचा शब्दसंग्रह कसा वाढेल याकडे प्राधान्याने लक्ष देतात. गेल्या सात वर्षापासून अहिल्यानगर शहरात या विद्यालयातने चांगला लौकिक वाढवला आहे असे ते म्हणाले.


बोल्हेगाव येथील इरा किडस् प्री स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. विद्यालयाच्या प्रांगणात हा सोहळा आयोजित करण्यात आला होता. प्रमुख पाहुणे म्हणून प्राध्यापक श्रीकांत सोनटक्के उपस्थित होते.

यावेळी विद्यालयातील माही डोके, शौर्य कातोरे, प्रिशा जराड, विजयालक्ष्मी प्रजापती, दर्शन साळवे, कार्तिकेय नेटके, पूर्वी खळेकर, प्रतीक प्रसाद, रुद्र गोसावी, शिवांश भद्रे व शिवांश विटेकर यांचा पारितोषिक देऊन सत्कार करण्यात आला. बेस्ट ऑल राऊंडर स्टुडन्ट उत्कर्ष शिंदे, सानवी वाघमारे त्यांचाही यावेळी सत्कार झाला. बक्षीस समारंभ नंतर मुलांनी पालकासमवेत विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम सादर केले. गणेश वंदना, लावणी, क्रेजी साँग, सांग सांग भोलेनाथ, एकनाथी भारुड, जय सियाराम, छत्रपती संभाजी महाराज यांच्या कर्तुत्वावर आधारित नरसिंगे या गाण्यावर मुलांनी नृत्य सादर केले. लुका छुपी व दिल हे छोटासा या रिमिक्स गाण्यावर मुलांसमवेत त्यांच्या आईने देखील फेर धरला उत्कर्ष शिंदे याने पोवाडा सादर केला. वंदे मातरम ने कार्यक्रमाची सांगता झाली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वर्षा राऊत यांनी केले तसेच प्रिन्सिपल अर्चना साळुंके यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. पाहुण्यांचा परिचय गौरी साळुंके यांनी करून दिला रेखा साळवे यांनी बक्षीस वितरण केले. कांचन वाघमारे यांनी आभार मानले. याचबरोबर सतीश वाघमारे आणि प्रतीक्षा शिंदे या पालकांनीही आपले आपल्या मुलांविषयी व शाळेविषयी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी शाळेतील शिक्षिका रेखा साळवे, कांचन वाघमारे, वर्षा राऊत, वंदना झिरपे, दिगंबर झिरपे यांनी परिश्रम घेतले.

# महिला दिनानिमित्त 'राघेय महिला गृह उद्योग'च्यावतीने २८ फेब्रुवारी व १ मार्चला 'आनंद नगरी खरेदी महोत्सव'

### घरगुती उद्योगांना थेट बाजारपेठ उपलब्ध करून देणारा उपक्रम

नगर – महिलांच्या घरगुती व लघुउद्योगातून तयार होणाऱ्या वस्तूंना थेट बाजारपेठ मिळावी, या उद्देशाने राघेय महिला गृह उद्योग यांच्या वतीने महिला दिनाचे औचित्य साधत 'आनंद नगरी खरेदी महोत्सव' आयोजित करण्यात आला आहे. हा महोत्सव २८ फेब्रुवारी व १ मार्च रोजी सकाळी ९ ते रात्री १० या वेळेत जैन स्थानक, शिवगंगा टॉवरजवळ, सारसनगर, अहिल्यानगर येथे होणार आहे.

या खरेदी महोत्सवात महिलांच्या घरगुती उद्योगांमधून तयार होणाऱ्या कपडे, ज्वेलरी, खाद्यपदार्थ, हस्तकला साहित्य, ब्युटी प्रॉडक्ट्स आदींचे स्टॉल्स उभारण्यात येणार असून ग्राहकांसाठी गेम स्टॉल्स व मोफत लकी ड्रॉ ही विशेष आकर्षणे असणार आहेत. ऑनलाइन नाही, ऑफलाइन खरेदी करा आणि स्थानिक व्यावसायिकांना प्रोत्साहन द्या, असा संदेश या महोत्सवाच्या माध्यमातून देण्यात येणार आहे.

या उपक्रमास रोटरी क्लब ऑफ प्रियदर्शनी यांचे सहकार्य लाभले असून सौ. प्रतिभा धुत यांचे प्रमुख प्रायोजकत्व मिळाले आहे. गृह उद्योगातून बनवलेल्या वस्तूंना थेट बाजारपेठ उपलब्ध व्हावी, महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करता यावे, यासाठी सौ. उज्वला मालू व सौ. स्वाती नागोरी यांनी या खरेदी महोत्सवाचे आयोजन केले आहे. या उपक्रमास रोटरी क्लब ऑफ प्रियदर्शनी यांचे सहकार्य लाभले असून या कार्यक्रमाविषयीची माहिती प्रियदर्शनी रोटरीच्या अध्यक्षा अनुराधा आठरे व सेक्रेटरी आश्लेषा भांडारकर, सौ. गीता गिल्डा यांनी दिली.

हा महोत्सव सर्वांसाठी खुला असून स्थानिक महिला उद्योजिकांना आपली उत्पादने थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे. तसेच नागरिकांनाही दर्जेदार, घरगुती व स्थानिक उत्पादनांची खरेदी करण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

कार्यक्रमास उपस्थित राहण्यासाठी किंवा अधिक माहितीसाठी सौ. उज्वला मालू मो. ७०२०३५२८१२, सौ. स्वाती नागोरी मो. ९६५७९११०६१ या क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. महिला दिनानिमित्त महिलांच्या कर्तृत्वाला चालना देणारा, घरगुती उद्योगांना नवे व्यासपीठ देणारा 'आनंद नगरी खरेदी महोत्सव' अहिल्यानगरसह परिसरातील नागरिकांसाठी निश्चितच आकर्षण ठरणार आहे.


आंतरशालेय विज्ञान उपकरण स्पर्धेत यश मिळविणाऱ्या आयकॉन स्कूलच्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले.

# आंतरशालेय विज्ञान उपकरण स्पर्धेत आयकॉन स्कूलचे यश

नगर – स्नेहालय इंग्लिश मीडियम स्कूल येथे भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आंतरशालेय विज्ञान उपकरण स्पर्धा घेण्यात आली. या उपक्रमास विविध शाळांतील विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला. द आयकॉन पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग नोंदवत वैज्ञानिक उपकरणे सादर करीत यश मिळवले.

कॅटेगरी १ (ग्रेड १ आणि २) मध्ये एअर अॅण्ड एअर प्रेशर या प्रकल्पासह प्रांशी कुमारी हिने प्रथम क्रमांक पटकावला, तर इको फ्रेंडली आयडियाज या प्रकल्पासह ईशांक दिवटे याने द्वितीय क्रमांक मिळवला. कॅटेगरी २ मध्ये सिंपल मशीन या प्रकल्पासाठी नचिकेत झावर याने प्रथम क्रमांक मिळवला, तर इको फ्रेंडली स्कूल या प्रकल्पासाठी राज अनभुले याने द्वितीय क्रमांक प्राप्त केला.

कॅटेगरी ३ (ग्रेड ६ ते ९) मध्ये आरण्य हॅच इन्क्युबेटर या नाविन्यपूर्ण प्रकल्पासाठी सौरिश अग्रवाल व शार्विल सोनवणे यांना द्वितीय क्रमांक मिळाला. या स्पर्धेत ध्रुवी लुंकड, सुखराज सिंग, वेदांत नरुला, असद खान पठाण, आरना कटारे, स्वामीराज पाटील व हर्ष सदवानी या विद्यार्थ्यांनीही विविध विज्ञानविषयक संकल्पनांवर आधारित प्रकल्प सादर करून सहभाग नोंदवला.

स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना एक हजार रुपये रोख पारितोषिक, तर द्वितीय क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना सातशे पन्नास रुपये रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

विद्यार्थ्यांना प्रकल्प सादरीकरणासाठी सारिका मॅडम, संजना मॅडम, सोनम मॅडम, चेतन सर, अजय के., प्राची मॅडम, अश्विनी मॅडम, आफरीन मॅडम, प्रीती मॅडम, शिंपी मॅडम, कीर्ती मॅडम व अनुश्री मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थेच्या संरक्षक मंगला मुथा, अध्यक्ष अशोक मुथा, विश्वस्त निर्मल मुथा, अमित मुथा, संचालक कर्नल आर. सी. राणा, आराधना राणा यांच्यासह ट्रस्टी व शाळा व्यवस्थापनाने विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# पालकांनी आपल्या पाल्यांच्या सुप्त गुणांना वाव देणे गरजेचे

### उपमहापौर धनंजय जाधव यांचे प्रतिपादन, बोल्हेगाव येथील किडस् सेकंड होम स्कुलमध्ये स्नेहसंमेलन

नगर – पालकांनी आपल्या पाल्यांच्या सुप्त गुणांना वाव देणे गरजेचे असे प्रतिपादन उपमहापौर धनंजय जाधव यांनी केले. माताजी श्री निर्मलादेवी प्रणित विश्व निर्मल फौंडेशन संचलित बोल्हेगाव येथील किडस् सेकंड होम प्री प्रायमरी स्कुल च्या स्नेह संमेलन प्रसंगी उपमहापौर धनंजय जाधव अध्यक्षस्थानी होते. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक कुमार वाकळे, नगरसेवक नवनाथ कातोरे, नगरसेविका सौ. आशाताई कातोरे, नगरसेविका सौ. सुनिता भिंगारदिवे, माजी नगरसेवक मदन आढाव, माजी नगरसेविका सौ.विनाताई बोज्ञा, संस्थेचे अध्यक्ष श्रीनिवास बोज्ञा, सचिव डॉ. लक्ष्मीकांत पारगावकर, संचालक संदीप ठोंबरे, खजिनदार संदीप गांगर्डे, संचालक सौ. राणी ठोंबरे, संचालक सौ. स्वाती पारगावकर आदी उपस्थित होते.


माताजी श्री निर्मलादेवी प्रणित विश्व निर्मल फौंडेशन संचलित बोल्हेगाव येथील किडस् सेकंड होम प्री प्रायमरी स्कुल च्या स्नेह संमेलन प्रसंगी उपमहापौर धनंजय जाधव अध्यक्षस्थानी होते.

कार्यक्रमाचे सुरुवातीस प्रमुख पाहुण्यांचे हस्ते माताजी श्री निर्मलादेवी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दिप प्रज्वलन करण्यात आले. स्नेहसंमेलन मध्ये विदयार्थ्यांकडून अनेक देश भक्तीपीर गीतावर नृत्य बसविण्यात आले. तसेच धर्मवीर संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित नाटिका प्रदर्शित करण्यात आली. कार्यक्रमामध्ये यावर्षीचे बेस्ट स्टुडन्ट अवॉर्ड आराध्या इथापे, शिवण्या गोरे, रितिका कदम, गार्गी येणारे, वेदिका जेजुरकर, ओवी यादव, आदिती पाटील, हर्षवर्धन कदम, शिवराज लगड, विराज कलसाईट, हर्षवर्धन येवले, श्रेयांश गांगर्डे, श्रेयश खेडकर, अंश आढाव यांना देण्यात आले. या स्नेहसंमेलनात विदयार्थ्यांच्या पालक महिलांनी सुद्धा सहभागी होऊन नृत्य सादर केले तर शेवटी शाळेतील शिक्षकांनीही नृत्य सादर करून सर्व पालक व श्रोत्यांची मने जिंकलीत.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष श्रीनिवास बोज्ञा यांनी केले त्या वेळी त्यांनी शाळेबाबत माहिती दिली व शाळेसाठी संस्थेने स्वमालकीची जागा घेतली असून लवकरच त्या ठिकाणी बांधकाम करून शाळा आपल्या स्वमालकीच्या जागेत जाईल असे सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. अर्चना भाटे मॅडम आणि सौ. दिपाली हजरे यांनी केले. डॉ. लक्ष्मीकांत पारगावकर यांनी आभार मानले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी मुख्याधापिका संगीता गांगर्डे, शिक्षिका अर्चना चव्हाण, रुपाली जोशी, अनिता गायकवाड, सीमा सोनावणे, पूर्वा भिंगारदिवे, पूजा शिरसाठ, लीना काळे, नीलम पवार, पालक प्रतिनिधी विशाल गव्हाणे, सचिन मुसाळे, इंद्रजित चव्हाण, ऋषिकेश वायकर, अमोल गांधले, ईश्वर गांगर्डे, शिवाजी कोलते, शिवाजी हजारे, रोहिदास पवार, निलेश नजन, भरत बनकर, महिला मध्ये वाजे मॅडम, कदम भारती, स्नेहल येणारे, अनिता कजबे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास पालक व नागरिक उपस्थित होते.

# न्यू आर्टस् कॉलेजच्या कॅसेस केंद्राचा मोठा शैक्षणिक टप्पा पार

## बी.एस्सी. क्लाऊड कॉम्प्युटिंगच्या विद्यार्थ्यांनी एडब्लूएस यूएसएकडून थेट आंतरराष्ट्रीय प्रमाणपत्र मिळवले

नगर – आजच्या काळात पदवी शिक्षणाबरोबर आंतरराष्ट्रीय दर्जाची कौशल्ये आत्मसात करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. न्यू आर्टस् कॉलेजचे कॅसेस केंद्र हे केवळ अभ्यासक्रम शिकवणारे केंद्र नसून, विद्यार्थ्यांना जागतिक आयटी इंडस्ट्रीसाठी तयार करणारे प्रभावी व्यासपीठ आहे, असे प्रतिपादन अमेरिकेतील विद्यापीठात कार्यरत सायंटिस्ट व संशोधन क्षेत्रातील अनुभवी अभ्यासक डॉ. बाबासाहेब सोनवणे यांनी केले.


न्यू आर्टस्, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर येथील न्यू आर्टस् कॉलेजचे कॅसेस केंद्र येथे राबविण्यात येणाऱ्या बी.एस्सी. क्लाऊड कॉम्प्युटिंग अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. बाबासाहेब सोनवणे आदी.

न्यू आर्टस्, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर येथील न्यू आर्टस् कॉलेजचे कॅसेस केंद्र येथे राबविण्यात येणाऱ्या बी.एस्सी. क्लाऊड कॉम्प्युटिंग अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांनी एडब्लूएस (यूएसए) कडून घेण्यात येणारी एडब्लूएस सर्टिफाईड क्लाऊड प्रॅक्टिशनर ही आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रमाणपत्र परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण केली. या यशाबद्दल कॅसेस केंद्राच्या वतीने विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला.

डॉ. सोनवणे हे अमेरिकेतील विद्यापीठामध्ये सायंटिस्ट म्हणून कार्यरत असून, त्यांना संशोधन क्षेत्रातील दीर्घ आणि समृद्ध अनुभव आहे. तसेच ते अमेरिका येथील आयटी इंडस्ट्रीचे सखोल अभ्यासक आहेत. त्यांच्या भाषणात त्यांनी कॅसेसकेंद्रातील अभ्यासक्रम रचना, आधुनिक अध्यापन पद्धती आणि उद्योगाभिमुख दृष्टिकोनाचे विशेष कौतुक केले. कॅसेससारख्या केंद्रातून ग्रामीण व जिल्हा स्तरावरील विद्यार्थीही जागतिक दर्जाचे कौशल्य आत्मसात करू शकतात, असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाला जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाच्या खजिनदार दीपलक्ष्मी म्हसे प्रमुख उपस्थित होत्या. आपल्या भाषणात त्यांनी न्यू आर्टस् कॉलेजच्या कॅसेस केंद्राच्या कार्यपद्धतीचे कौतुक करून या कार्यक्रमातून न्यू आर्टस् कॉलेजचे कॅसेस केंद्र, आंतरराष्ट्रीय प्रमाणपत्र यश आणि शैक्षणिक उत्कृष्टता यांचा प्रभावी संगम दिसून आला असून, भविष्यातही कॅसेस केंद्रामार्फत आधुनिक आयटी व क्लाऊड कॉम्प्युटिंग क्षेत्रासाठी सक्षम विद्यार्थी घडविण्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

एडब्लूएस सर्टिफाईड क्लाऊड प्रॅक्टिशनर परीक्षेत यशस्वी विद्यार्थ्यांचा डॉ. बाबासाहेब सोनवणे व अ‍ॅड. दीपलक्ष्मी म्हसे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

प्रास्ताविक न्यू आर्टस् कॉलेजचे कॅसेस केंद्र प्रमुख प्रा. अरुण गांगर्डे यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी कॅसेस केंद्राची उभारणी, बी.एस्सी. क्लाऊड कॉम्प्युटिंग अभ्यासक्रमाची रचना, उपलब्ध शैक्षणिक व तांत्रिक सुविधा यांची माहिती दिली. तसेच विभागात राबविण्यात येणाऱ्या नावीन्यपूर्ण टीचिंग पेडॅगॉजी बाबत सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचा समारोप प्रा. सौ. प्रियवदा पाटील यांनी आभार प्रदर्शनाने केला.

# स्वकुळ साळी मंडळ ट्रस्टवर अनुजा कांबळे यांची निवड

नगर – येथील स्वकुळसाळी हितसंवर्धक मंडळ च्या ट्रस्टवर संलग्न समिती समितीवर अनुजा कांबळे यांची निवड करण्यात आली. तसे पत्र विश्वस्त प्रमुख विक्रम पाठक यांनी दिले. यावेळी सेक्रेटरी विजय मानकर, विश्वस्त संजय सागावकर उपस्थित होते.


स्वकुळसाळी हितसंवर्धक मंडळच्या ट्रस्टवर संलग्न समिती समितीवर अनुजा कांबळे यांची निवड करण्यात आली.

ट्रस्टच्या माध्यमातून अनुजा कांबळे यांनी अनेक समाज उपयोगी कार्यक्रम राबवले आहे त्यामुळे त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच लवकरच हितसंवर्धक मंडळाच्या अंतर्गत सर्व महिला चे मंडळ तयार करण्यात येऊन महिलांचे बचत गट, सहकारी संस्था व विविध उपक्रम राबवण्यात येणार असल्याची माहिती विक्रम पाठक यांनी दिली

अनुजा कांबळे या अखिल महाराष्ट्र स्वकुळ साळी महिला मंडळाच्या कार्यकारिणी सदस्या व ब्युटिशियन असून मराठी फिल्म इंडस्ट्रीत फिल्म मेकअप आर्टिस्ट व हेअर स्टायलिस्ट चे काम करत असून त्याच बरोबर त्या नाटक, शॉर्टफिल्मचे काम काम करतात तसेच त्यांनी अनेक फिल्म मध्ये रोलही केले आहेत तसेच त्या जिल्हा ब्युटिशियन असोसिएशनच्या व प्रतिबिंब संस्थेच्या अध्यक्षा आहेत.

# पेमराज सारडा महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागात जीएसटी व टॅली प्राईम सर्टिफिकेट कोर्सचे आयोजन

नगर – पेमराज सारडा महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागाच्या वतीने जीएसटी (वस्तू व सेवा कर) आणि टॅली प्राईम या विषयांवरील सर्टिफिकेट कोर्सचे यशस्वी आयोजन करण्यात आले. सुमारे दोन महिन्यांपासून सुरू असलेल्या या अभिनव उपक्रमात विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. १७ फेब्रुवारी रोजी या कोर्सचा समारोप समारंभ उत्साहात पार पडला.

समारोप प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. यावेळी गावित म्हणाल्या, या सर्टिफिकेट कोर्सच्या माध्यमातून वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञानासोबतच रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होणार आहेत. जीएसटी प्रणालीचे सखोल मार्गदर्शन तसेच टॅली प्राईम सॉफ्टवेअरचे प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात आल्यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास अधिक दृढ झाला आहे. उद्योगजगताच्या गरजा लक्षात घेऊन राबविण्यात आलेला हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासासाठी उपयुक्त ठरला आहे.



या उपक्रमाचे आयोजन वाणिज्य विभागप्रमुख डॉ.प्रिया सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. वाणिज्य शाखेतील प्राध्यापकांच्या त्यांच्या नियोजनबद्धतेमुळे कोर्स यशस्वीरीत्या पूर्णत्वास गेला. या उपक्रमामुळे वाणिज्य विभागाच्या गुणवत्तापूर्ण शिक्षण परंपरेला अधिक बळ मिळाले असून विद्यार्थ्यांच्या विकासाला नवी दिशा मिळाली आहे.

समारोपप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित यांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे व बक्षिसांचे वितरण करण्यात आले. यावेळी उपप्राचार्य प्रा.मिलिंद देशपांडे तसेच प्रबंधक अशोक असेरी उपस्थित होते.

तसेच हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक, मानद सचिव संजय जोशी, कार्याध्यक्ष व वरिष्ठ महाविद्यालय व्यवस्थापन समितीचे चेअरमन डॉ. रमेश झरकर तसेच कनिष्ठ महाविद्यालय व्यवस्थापन समितीचे चेअरमन डॉ.पारस कोठारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या यशस्वी उपक्रमामुळे पेमराज सारडा महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागाने विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख शिक्षण देण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. यावेळी विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.प्रिया सारडा यांनी केले. तर आभारप्रदर्शन प्रा.ओंकार भिंगारदिवे यांनी केले.

# चारित्ररत्न विजयजी महाराजा साहेब यांचे १८ फेब्रुवारी रोजी जैन मंदिरात आगमन

नगर – दिक्षादानेश्वर आचार्य भगवंत श्री गुणरत्न सुरीश्वरजी महाराजा साहेब यांचे शिष्य प्रखर वक्ता पंन्यास श्री चारित्ररत्न विजयजी महाराजा साहेब आदि ठाणा २ यांचे १८ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता कापड बाजार जैन मंदिरात आगमन होणार आहे. याठिकाणी त्यांचे अतिशय प्रभावी, प्रखर आणि प्रत्येकाच्या जीवनाला दिशा देणारे उद्बोधक प्रवचन होणार आहे.




तत्पूर्वी सकाळी ८.३० वाजता तेलीखुंट हॉटेल लोकसेवा येथून गुरु भगवंतांचा सामय्या चालू होईल. तेलीखुंट चौक, घास गल्ली कोपरा, कोहिनूर मार्गे त्यांचे कापड बाजार जैन मंदिरात आगमन होईल. गुरू भगवंतांच्या ओजस्वी वाणीतून त्यांचे अतिशय प्रभावशाली विचार ऐकण्याची संधी सकल संघाला मिळाली आहे.

भाविकांनी यावेळी उपस्थित राहण्याचे आवाहन कापड बाजार जैन मंदिराचे अध्यक्ष सुभाष मुथा व सर्व ट्रस्टी मंडळाने केले आहे.

# प्रविणऋषीजी म.सा. यांच्या नगरमधील चातुर्मासाची संपूर्ण नियोजन व्यवस्थेची जबाबदारी सौरभ बोरा परिवार करणार

नगर – राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी म.सा.यांचे परमशिष्य उपाध्याय प्रवर प्रविणऋषीजी म.सा. यांचा सन २०२६ चा चातुर्मास अहिल्यानगर येथे आनंदधाम परिसरात होणार आहे. हा ऐतिहासिक चातुर्मास श्रावक श्राविकांसाठी मोठी पर्वणी ठरणार आहे. या चातुर्मासाची संपूर्ण व्यवस्था व नियोजनाची जबाबदारी अहमदनगर मर्चंटस बँकेचे संस्थापक स्व.हेमराज बोरा, बँकेच्या विद्यमान संचालिका प्रमिलाताई बोरा व मुंबई स्थित उद्योगपती सौरभ हेमराज बोरा परिवाराने घेतली आहे, अशी माहिती सौरभ बोरा यांचे मेहुणे व प्रविणऋषीजी म.सा.यांचे भक्त, राजेंद्र चोपडा यांनी दिली.


सौरभ बोरा


प्रमिला बोरा

नगरमधील बोरा परिवार अतिशय धार्मिक वृत्तीचा व सामाजिक कार्यात योगदान देणारा आहे. सौरभ बोरा यांना सलग तिसऱ्यांदा जगप्रसिध्द तिरूपती बालाजी देवस्थानवर ट्रस्टी म्हणून योगदान देण्याची संधी मिळाली आहे. त्यांच्या माध्यमातून नगरसह राज्यातील भाविकांना तिरूपती बालाजी येथे अतिशय चांगल्या पध्दतीने दर्शन मिळते. उपाध्याय प्रवर प्रविणऋषीजी म.सा.यांच्यावर त्यांची नितांत श्रध्दा आहे. त्यामुळेच त्यांनी २०२६ मध्ये आनंदधाम परिसरात होणाऱ्या प्रविणऋषीजी महाराज यांच्या चातुर्मासाच्या नियोजनाची संपूर्ण जबाबदारी स्वेच्छेने स्विकारली आहे. चातुर्मास काळात आवश्यक त्या सर्व व्यवस्था सौरभ बोरा परिवार करणार आहे.

सौरभ बोरा यांनी आचार्यश्रींचे जन्मस्थळ शिराळ चिचोंडी येथे जावून प्रविणऋषीजी म.सा.यांची नुकतीच भेट घेवून आशीर्वाद घेतले व चातुर्मास नियोजनाबाबत मार्गदर्शन मिळवले. यावेळी नगरमधील संजय ताथेड, किरण राका, आदेश चंगेडिया, नितीन चंगेडे, संदीप गांधी, बाबूशेठ बोरा, संतोष पिपाडा, राजेंद्र बोरा, कमलेश गुगळे, सुधीर मुनोत, विजय गुगळे आदींसह बोरा यांचा मित्र परिवार उपस्थित होता. चातुर्मास काळात चारही महिने सौरभ बोरा परिवार, त्यांच्या परिवारातील विवाहित मुली, जावई यांचा परिवार व बोरा यांचा मोठा मित्र परिवार धार्मिक सेवा देणार आहे.

# दैनंदिन ताणतणावावर मात करण्यासाठी २२ फेब्रुवारीला मोफत एक दिवसीय राजयोगा मेडिटेशन कोर्सचे आयोजन

नगर – येथील 'साईबन में मधुबन' पाठशाला व्दारा ब्रह्माकुमारीज्चे एक दिवसीय राजयोगा मेडिटेशन कोर्स २२ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ ते संध्या ५ वाजेपर्यंत होणार आहे. अशी माहिती राजयोगा जीवनशैली मेडिटेशनच्या अभ्यासक डॉ. सुधा कांकरिया यांनी दिली.

आजकालचे जीवन धकाधकीचे, ताणतणावाचे व गुतागुंतीचे झाले आहे. मनाची शक्ती क्षीण झाल्यामुळे पटकन राग येणे, नाराज होणे, चिडणे, दु:खी होणे, डिप्रेशनमध्ये जाणे, मनोविकाराचे शिकार होणे या प्रकारच्या रूग्णांची संख्या वाढत चालली आहे. चिंता, टेन्शन, ताणतणाव यामुळे रक्तदाब वाढणे, हृदयविकार, कॅन्सरचे प्रमाण वाढत चालले आहे. लहान मुले अधिक चंचल होऊ पहात आहेत, अभ्यासासाठी आवश्यक असणारी एकाग्रता आजकाल दिसत नाही, नाते संबंधामधील कटुता, एकमेकांना समजावून न घेण्याची मानसिकता यामुळे घटस्फोटाचे प्रकार वाढत चालले आहेत. जाती धर्मातील तणाव वाढुन दंगे, वादविवाद होतांना दिसतात. ही सर्व लक्षणे अशांत, अस्थीर, अशक्त मनाची आहेत. या सर्व समस्यातून बाहेर पडण्याचा मार्ग आपल्याला राजयोगा जीवन पध्दतीमध्ये नक्कीच सापडतो. ही जीवन पध्दती समजुन घेऊन आपण आपल्या जीवनात जर धारण केली तर नक्कीच जीवन सहज, सुंदर, आनंदी, स्वस्थ व यशस्वी होण्यास मदत होते यासाठीच १ दिवसीय राजयोगा जीवनशैली मेडिटेशनचा कोर्स आयोजित केला आहे असे स्पष्टीकरण डॉ. सुधा कांकरिया यांनी केले आहे.

सदर कोर्स एम आय डी सी येथील साईबन कृषी पर्यटन येथे 'साईबन में मधुबन' या परिसरात होणार असून येथील इको फ्रेंडली मेडिटेशन झोपडी, पीस पार्क, मेडिटेशन प्रदर्शनी, सृष्टीचक्र, पीस पहाडी, पपेट शो चा ही आनंद साधकांना घेता येणार आहे. सदर कोर्समध्ये वय वर्षे १८च्या पुढील सर्व स्त्री पुरूषांना सहभागी होता येईल. हा कोर्स फ्री मोफत असला तर नांवनोंदणी करणे मात्र आवश्यक आहे. नांदनोंदणी ९८५०८८७८३८ प्रिया दिदी येथे १९ फेब्रुवारी पुर्वी करावे असे संयोजक कळवितात. रोटरी पीस अ‍ॅन्ड हार्मनी सेंटर रोटरी क्लब ऑफ अहमदनगर यांचे विशेष सहकार्य लाभत आहे. यात सहभागी व्हावे असे अध्यक्ष सुभाष गर्जे यांनी सांगितले.


## -: सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग :-

### मे.सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, अ.नगर तालुका पतसंस्था फेडरेशन मर्या.अ.नगर महात्मा फुले चौक, मार्केटयार्ड, अ.नगर यांचे कार्यालय.

## जाहीर समन्स

**मार्कंडेय नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित,दिल्लीगेट,अहिल्यानगर. ता. जि. अहिल्यानगर.** या संस्थेने त्यांचे कर्जदार / जामिनदार यांचे विरुद्ध महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये वसुली दाखला मिळणे बाबत प्रस्ताव दिनांक. २२/१२/२०२५ रोजी या कार्यालयास दाखल केला असून त्यानुसार या कार्यालयाने कलम १०१ अन्वये दिनांक २३/१२/२०२५ व दिनांक २१/०१/२०२६ रोजी सुनावणीची नोटीस देऊन त्यांची सुनावणी दिनांक ०७/०१/२०२६ व दिनांक २१/०१/२०२६ व दिनांक १०/०२/२०२६ रोजी ठेवण्यात आलेली होती. सदर सुनावणीच्या नोटिसा संबंधितांना रजिस्टर पोस्टाने पाठविण्यात आलेल्या होत्या. परंतु सदरच्या नोटीसची बजावणी झालेली नाही किंवा जाबदेणार सुनावणीस हजर राहिलेले नाहीत, नैसर्गिक न्याय तत्त्वाचे दृष्टीने सुनावणीचे जाहीर समन्स दैनिक वर्तमानपत्रात प्रसिद्ध करून त्याची सुनावणी दिनांक **२५ /०२/ २०२६** रोजी सकाळी ११:३० वाजता मा.सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (परसेवा) अ.नगर तालुका पतसंस्था फेडरेशन मर्यादित अहिल्यानगर महात्मा फुले चौक, गाळा न.४,पहिला मजला, GS महानगर बँकेशेजारी,अहिल्यानगर. यांचे कार्यालयात ठेवण्यात येत आहे. सदर सुनावणीचे दिवशी जाब देणार हे हजर राहिले नाहीत किंवा म्हणणे सादर केले नाही किंवा सादर केलेले म्हणणे समाधानकारक वाटले नाही तर संस्थेने मागणी केले प्रमाणे कलम १०१ अन्वये वसुली दाखला देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

| अ.नं. | दावा क्रमांक | कर्जदाराचे/जामीनदाराचे नाव | दावा रक्कम |
|---|---|---|---|
| १ | २०५<br>---<br>२०२६ | जाबदेणार १) श्री– न्यालपेल्ली गणेश ईश्वरय्या.<br>राहणार :– १२८,बागरोजा हडको,दिल्लीगेट,अहिल्यानगर.<br>जाबदेणार २) श्री– तडका मुकुंद मल्लय्या.<br>राहणार:– निलगिरी अपार्टमेंट, तोफखाना,अहिल्यानगर.<br>जाबदेणार ३) श्री– श्रीगादी श्रीशैलम लक्ष्मण.<br>राहणार:– घर नं.५७३४,चितळे रोड,पापय्या गल्ली,अहिल्यानगर. | २६,१३३/- |
| २ | २०६<br>---<br>२०२६ | जाबदेणार १) श्री– दासरी सौरभ विष्णु<br>राहणार :– ४६११ झरेकरगल्ली,सबजेल चौक, अहिल्यानगर.<br>जाबदेणार २) श्री– नरसाळे सागर गोविंद.<br>राहणार:– प्लॉट नं.डी–७२,आनंद कॅन्टीन,अहिल्यानगर.<br>जाबदेणार ३) श्री– दासरी रोहित श्रीनिवास.<br>राहणार:– ४६११ झरेकरगल्ली,सबजेल चौक, अहिल्यानगर. | ४९,३८३/- |
| ३ | २०८<br>---<br>२०२६ | जाबदेणार १) श्री– पिस्का अमित अशोक<br>राहणार :– जुनामंगळवार बाजार,सामलवाडा, अहिल्यानगर.<br>जाबदेणार २) श्री– कांबळे महेश जालिंदर.<br>राहणार:– अमरधामसमोर,रावसाहेब खंडागळे वाडा,नालेगाव,अहिल्यानगर.<br>जाबदेणार ३) श्री–जिंदम मुकेश अर्जुन.<br>राहणार:– एकदंत कॉलनी,बेत्तीवाडा,दातरंगे मळा, अहिल्यानगर. | ३५,५३८/- |
| ४ | २०९<br>---<br>२०२६ | जाबदेणार १) सौ– सुंकी संगीता मीनानाथ.<br>राहणार :– ६१३,तोफखाना,अहिल्यानगर.<br>जाबदेणार २) श्री– सुंकी मीनानाथ /मनोज पांडुरंग.<br>राहणार:– रिमांड होम,झारेकर गल्ली,अहिल्यानगर.<br>जाबदेणार ३) श्री– धेंड संतोष प्रकाश.<br>राहणार:–गाडगीळ पटांगण,नालेगाव, अहिल्यानगर. | ३२,३८७/- |
| ५ | २१०<br>---<br>२०२६ | जाबदेणार १) श्री– शेख शेरू इस्माईल.<br>राहणार :– स्टे.रोड,बोहरी चाळ,गवळी वाडा,अहिल्यानगर.<br>जाबदेणार २)श्री– सय्यद शाहफैसल बुऱ्हाण.<br>राहणार:– ५४९१,आशा टॉकिज,तख्ती दरवाजा,अहिल्यानगर.<br>जाबदेणार ३) श्री– त्रिपाठी आशिष योगेंद्र.<br>राहणार:– अर्बन बँक कॉलनी,बालिकाश्रम रोड,अहिल्यानगर. | ३७,२०५/- |
| ६ | २११<br>---<br>२०२६ | जाबदेणार १) श्री– सुरम अमित अंबादास.<br>राहणार :– ज्ञानसंपदा शाळेजवळ,तपोवन रोड,अहिल्यानगर.<br>जाबदेणार २)श्री– बोडखे सारंग चंद्रकांत.<br>राहणार:– पावननगर राममंदिराजवळ,घर न १८,अहिल्यानगर.<br>जाबदेणार ३) श्री– म्याना महिंद्र कैलास.<br>राहणार:– ३२ क,श्रमिकनगर,सावेडी,अहिल्यानगर. | ८३,३१९/- |
| ७ | २१२<br>---<br>२०२६ | जाबदेणार १) श्री– पिस्का प्रणव अशोक.<br>राहणार :– जुना मंगळवार बाजार,अहिल्यानगर.<br>जाबदेणार २) श्री– नागपुरे अमोल अरुण.<br>राहणार:– ४३ब,रेणावीकर कॉलनी,निर्मलनगर,अहिल्यानगर.<br>जाबदेणार ३) श्री– पिस्का अमित अशोक.<br>राहणार:–४४१६,सामलवाडा, जुना मंगळवार बाजार,अहिल्यानगर. | ३५,३२१/- |
| ८ | २१३<br>---<br>२०२६ | जाबदेणार १) सौ–भुसा निता संतोष.<br>राहणार :– रंगारगल्ली,गौरीघुमट,महाले मंगल कार्या.जवळ,अहिल्यानगर.<br>जाबदेणार २) सौ–गुरप सुरेखा शैलेंद्र.<br>राहणार:– ५६७ भैरवनाथ मंदिरासमोर,तोफखान,अहिल्यानगर.<br>जाबदेणार ३) सौ–गालपेल्ली माधवी भूमय्या.<br>राहणार:–५६७–३,भराडगल्ली,भैरवनाथ मंदिरासमोर,तोफखाना,अहिल्यानगर. | ३५,८०८/- |
| ९ | २१४<br>---<br>२०२६ | जाबदेणार १)सौ– गुरप किर्ती शैलेंद्र.<br>राहणार:– ५६७ भैरवनाथ मंदिरासमोर,तोफखान,अहिल्यानगर.<br>जाबदेणार २)सौ– गालपेल्ली माधवी भूमय्या.<br>राहणार:–५६७–३,भराडगल्ली,भैरवनाथ मंदिरासमोर,तोफखाना,अहिल्यानगर.<br>जाबदेणार ३)सौ– भुसा निता संतोष.<br>राहणार :– रंगारगल्ली,गौरीघुमट,महाले मंगल कार्या.जवळ, अहिल्यानगर. | ८०,१०५/- |
| १० | २१५<br>---<br>२०२६ | जाबदेणार १)सौ/श्री– बोडखे सविता शेखर व बोडखे शेखर रमेश.<br>राहणार:– घर नं.३०२,भावना ऋषी सोसायटी,अहिल्यानगर.<br>जाबदेणार २) श्री– धुमाळ संजय वसंतराव.<br>राहणार:–७७८ कॅम्प कौलारू,सर्जेपुरा,राम मंदिराजवळ,अहिल्यानगर.<br>जाबदेणार ३) श्री– आडम निखिल रमेश.<br>राहणार :–घ.न.४० क,श्रमिकनगर,सावेडी,अहिल्यानगर. | ३,२८,७७१/- |
| ११ | २१६<br>---<br>२०२६ | जाबदेणार १) श्री– अमृत सुनिल हनुमंतु.<br>राहणार:– १०२,सिमला कॉलनी,सावेडी,अहिल्यानगर.<br>जाबदेणार २) श्री– लोंढे किशोर भाऊसाहेब.<br>राहणार:–प्लॉट नं.६७/२,समर्थनगर,नवनागपुर,वडगाव गुप्ता,अहिल्यानगर.<br>जाबदेणार ३) श्री– रायपेल्ली विष्णु चंद्रकांत.<br>राहणार :–गंगा विंग,स्वप्नपूर्ती,लिंकरोड,केडगाव,अहिल्यानगर. | ४२,८२१/- |
| १२ | २१७<br>---<br>२०२६ | जाबदेणार १) श्री– छिंदम अंबादास विष्णु.<br>राहणार:– ५१४,तोफखाना,अहिल्यानगर.<br>जाबदेणार २) श्री– पिडीयार राजेश रमेश.<br>राहणार:– २३४ प्रेमदान हडको,महावीर किराणा स्टो.सावेडी,अहिल्यानगर.<br>जाबदेणार ३) श्री– जोग विनायक नारायण.<br>राहणार :– ३७ ड,श्रमिकनगर,सावेडी,अहिल्यानगर. | ४५,४५२/- |
| १३ | २१८<br>---<br>२०२६ | जाबदेणार १) श्री– जरे वैभव भाऊसाहेब.<br>राहणार :– बंधन लॉनजवळ,वेदांत कॉ.पाईपलाईन रोड,सावेडी,अहिल्यानगर.<br>जाबदेणार २) श्री– भिडे अनिल अमृतराव. राहणार:– घ.नं.२७, बीएम–हाईट्स,अनुसयानगर,शिंदे मळा,पाईप लाईन रोड,सावेडी,अहिल्यानगर.<br>जाबदेणार ३) श्री– झेंडे दत्तात्रय गंगाराम.<br>राहणार :–चिखली. ता– श्रीगोंदा. जि. अहिल्यानगर. | ५५,२२८/- |
| १४ | २१९<br>---<br>२०२६ | जाबदेणार १) श्री– सिरसुल प्रविण किसनराव.<br>राहणार :– ४५७३ येनगंदूल वाडा,झारेकर गल्ली,अहिल्यानगर.<br>जाबदेणार २) श्री– कटला प्रदिप इस्तरी.<br>राहणार:– कल्याणरोड,गणेशनगर,पाण्याच्या टाकीमागे,अहिल्यानगर.<br>जाबदेणार ३) श्री– बोरुडे तुषार अर्जुन.<br>राहणार :–चितळे रोड,पिंगारा हॉटेल जवळ,तोफखाना,अहिल्यानगर. | ५७,८१५/- |
| १५ | २२०<br>---<br>२०२६ | जाबदेणार १) सौ–शिंदे अनिता चंद्रकांत<br>राहणार:– घ.नं.२५७,समर्थ शाळेजवळ,सांगळे गल्ली,अहिल्यानगर.<br>जाबदेणार २) श्री– माळी बाळासाहेब रंगनाथ.<br>राहणार:– घ.नं.२१ ब,प्रेमदान हडको,प्रोफेसर कॉलनी रोड,सावेडी,अहिल्यानगर.<br>जाबदेणार ३) श्री– खराडे महेश पोपट.<br>राहणार :–सन.२२/१२/७/१/२/१प्लॉट न.३/७/१ गणपती मंदिराजवळ, रभाजीनगर,केडगाव,अहिल्यानगर. | ३४,९४७/- |
| १६ | २२१<br>---<br>२०२६ | जाबदेणार १) सौ.बोद्दुल ज्योती भूमेश<br>राहणार:–ढवण वस्ती,तपोवन रोड,सावेडी,अहिल्यानगर.<br>जाबदेणार २) सौ– सग्गम पद्मा रमेश.<br>राहणार:–घ.नं.८,रेणुकानिवास,आरेनापार्क,बरबडेवस्ती, पाईपलाइनरोड, सावेडी,अहिल्यानगर.<br>जाबदेणार ३) श्री– बोद्दुल मदन गरुडाद्री.<br>राहणार :–लिंक रोड,पागा बिल्डींग,स्वप्नपूर्ती अपार्ट.अहिल्यानगर. | ६९,२७५/- |
| १७ | २२२<br>---<br>२०२६ | जाबदेणार १) श्री–जज्जर विशाल पांडुरंग<br>राहणार:– घन.५९३,ठाकूर वाडा,तोफखाना,अहिल्यानगर.<br>जाबदेणार २) श्री–देशपांडे उल्हास सदाशिव.<br>राहणार :–गावठाण जवळ,नवेअंबिकानगर,केडगाव.ता/जि.अहिल्यानगर.<br>जाबदेणार ३) सौ–रायपेल्ली शैला विठ्ठल.<br>राहणार :–घन.६८०,विठ्ठल मंदिराजवळ,नवरंगगल्ली,तोफखाना,अहिल्यानगर. | ५९,३८१/- |
| १८ | २२३<br>---<br>२०२६ | जाबदेणार १) श्री– कोमाकुल शेखर दत्तात्रय.<br>राहणार:– चेन्नुर वाडा,दत्त मंदिराजवळ,दातरंगे मळा,अहिल्यानगर.<br>जाबदेणार २) श्री– सुंकी यशवंत रामदास.<br>राहणार:– मॉडर्न कॉलनी,श्रीनाथ कॉम्प्ले.मागे,अहिल्यानगर.<br>जाबदेणार ३) सौ– अंकम कविता मनोहर.<br>राहणार :–५९१/९२,तोफखाना,अहिल्यानगर. | १,२६,२९८/- |
| १९ | २२५<br>---<br>२०२६ | जाबदेणार १) श्री– ताकपिरे अमित अशोक.<br>राहणार:– १९०३,बनासाहेब पटांगण,मोहनबाग,अहिल्यानगर.<br>जाबदेणार २) श्री– देशमुख कौस्तुभ भगवान.<br>राहणार:– मोहनबाग,अहिल्यानगर.<br>जाबदेणार ३) श्री– अस्वर सारंग अंबादास.<br>राहणार :– १३७,मोहनबाग,दिल्लीगेट,अहिल्यानगर. | ८६,७५०/- |
| २० | २२६<br>---<br>२०२६ | १) श्री– तवले बालाजी पांडुरंग.<br>राहणार:– म्हस्के कॉ,वाणीनगर,पाईपलाईनरोड,अहिल्यानगर.<br>२) श्री– खळदकर देविदास गोकुळ.<br>राहणार:– पिंपळेवाडीरोड,वडगाव तांदळी,अहिल्यानगर.<br>३) श्री– भोर संकेत साहेबराव.<br>राहणार :–दगडी चाळ,लोहगाव.ता/जि–अहिल्यानगर. | ७७,७६०/- |
| २१ | २२७<br>---<br>२०२६ | जाबदेणार १) श्री– गौरी स्वप्निल ढवण.<br>राहणार:– राजनगर,ढवणवस्ती,तपोवन रोड,अहिल्यानगर.<br>जाबदेणार २) श्री– विजय राजेंद्र शिंदे.<br>राहणार:– राजनगर,ढवणवस्ती,तपोवन रोड,अहिल्यानगर.<br>जाबदेणार ३) श्री– प्रशांत दत्तात्रय कराळे.<br>राहणार :– राजनगर,ढवणवस्ती,तपोवन रोड,अहिल्यानगर. | २,१२,०४४/- |

ठिकाण : अहिल्यानगर
दिनांक : १०/०२/२०२६

**(बाळकृष्ण शिंदे)**
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (परसेवा) अ.नगर तालुका पतसंस्था फेडरेशन,अ.नगर

# जोश

## शेर की जुबानी

कोई चिराग जलाता नहीं
सलीके से।
मगर सभी को शिकायत
हवा से होती है।

वो साथ थी तो जन्नत थी
जिंदगी दोस्तो,
अब तो हर सांस जिंदा हरने की,
वजह पुछती है।

पलकों से रास्ते के कांटे हटा देंगे, फूलों को क्या हम, अपना दिल बिछा देंगे, टुटने ना देंगे अपनी दोस्ती को कभी, बदले में हम खुदको मिटा देंगे।

## Google गूगल संभाषण रेकार्ड करते?

टेक्नो टॉक

आपण फोनवर एखाद्या विषयावर बोलल्यानंतर लगेचच संबंधित जाहिराती दिसतात. यामुळे गूगल आपले संभाषण गुप्तपणे रेकॉर्ड करते का, असे वाटते. यामागे गूगल व्हॉइस ॲक्टिव्हिटी नावाचे एक फीचर आहे.

गूगल व्हॅइस ॲक्टिव्हिटी व्हॉइस कमांड आणि शोध रेकॉर्ड सेव्ह करते. आपण ओके गूगल किंवा हे गूगल, असे म्हणत व्हॉइस शोध करतो, तेव्हा रेकॉर्डिंग तुमच्या खात्यात सेव्ह केले जाऊ शकते. त्याचा उद्देश गूगल असिस्टंट सुधारणे आणि तुम्हाला अधिक अचूक परिणाम प्रदान करणे, असा आहे. गूगलच्या मते युजर व्हॉइस कमांड देतो किंवा मायक्रोफोन वापरण्याची परवानगी देतो तेव्हाच ते व्हॉइस रेकॉर्ड करते. तथापि, कधीकधी काही ऑडिओ क्लिप्स सेव्ह होऊ शकतात, म्हणूनच लोकांना वाटते, की गूगल नेहमीच ऐकत आहे.

गूगलने तुमच्या कोणत्या व्हॉइस ॲक्टिव्हिटीज सेव्ह केल्या आहेत, हे पाहायचे असेल तर गूगल खात्यात जा आणि ॲक्टिव्हिटी कंट्रोल्स किंवा माझी ॲक्टिव्हिटी विभाग उघडा. व्हॉइस आणि ऑडिओ ॲक्टिव्हिटी अंतर्गत, तुम्हाला तारीख आणि वेळ असलेले तुमचे रेकॉर्डिंग दिसतील, ते तुम्ही स्वत: ऐकू शकता. तुम्हाला हे रेकॉर्डिंग आवडत नसेल तर तुम्ही वैयक्तिक रेकॉर्डिंग हटवू शकता किंवा व्हॉइस ॲक्टिव्हिटी पूर्णपणे साफ करू शकता. तुमचा आवाज सेव्ह होण्यापासून रोखण्यासाठी तुम्ही सेटिंग्जमध्ये व्हॉइस आणि ऑडिओ ॲक्टिव्हिटी बंद करू शकता. तुमची गोपनीयता मजबूत करण्यासाठी, वेळोवेळी तुमचे गूगल खाते ॲक्टिव्हिटी तपासा.

फक्त आवश्यक ॲप्सना मायक्रोफोन परवानग्या द्या आणि तुम्ही ते वापरत नसाल तर हे गूगल फीचर बंद करा. गूगल व्हॅइस ॲक्टिव्हिटीफ हे स्पाय फीचर नाही; परंतु ते तुमचे व्हॉइस सर्च आणि कमांड सेव्ह करते.

## झटपट रेसिपी



### पंजाबी तडका मॅगी

दोस्तांनो, भूक लागल्यावर फार वेळ नसेल तर पटकन मॅगी केलं जातं. या मॅगीला तुम्ही मस्त ट्विस्ट देऊ शकता. गंमत म्हणून पंजाबी तडका मॅगी बनवून बघा.

साहित्य : एक चमचा बटर, अर्धा चमचा तेल, तुमच्या आवडीच्या भाज्या, पाच चमचा गरम मसाला, दोन–तीन लसूण पाकळ्या, दोन–तीन सुक्या लाल मिरच्या, तिखट आणि मीठ.

कृती : एका कढईत तेल घाला. त्यात लांबट चिरलेला कांदा आणि गाजराचे तुकडे घाला. परतून घ्या. मग यात सिमला मिरची, मटार आणि टोमॅटो घाला. तुम्हाला फ्लॉवर, ब्रोकोली किंवा इतर भाज्या आवडत असतील तर त्याही घालता येतील. मग यात मीठ आणि पाणी घाला. शिजू द्या. मग यात मॅगी नूडल्स आणि मसाला घाला. मॅगी शिजवून घ्या. मॅगीत थोडं पाणी ठेवा. आता दुसऱ्या कढईत किंवा पॅनमध्ये बटर आणि तेल घाला. त्यात जीरं घाला. मग लसणाचे बारीक तुकडे घालून परतून घ्या. यानंतर सुक्या लाल मिरच्या, लाल तिखट, गरम मसाला आणि मीठ घाला. यात दुसऱ्या कढईतलं मॅगी घालून दोन मिनिटं शिजू द्या. तुमचं पंजाबी तडका मॅगी तयार आहे.

## पुरुषांचा भरतकाम, रंगकामावर भर

फॅशन पॅशन



डिझायनर्सचा असा विश्वास आहे, की पुरुषांची फॅशन लक्षणीयरीत्या विकसित झाली आहे आणि बरेच पुरुष चमकदार रंग आणि भरतकाम स्वीकारत आहेत. ते एकेकाळी केवळ महिलांची फॅशन मानले जात होते. गुलाबी रंगाचा स्टिरियोटाइप हळूहळू कमी होत चालला आहे. त्यामुळे पुरुषांच्या फॅशनमध्ये विविधता येत आहे.

खरा बदल पुरुषांच्या कपड्यांमध्ये आला आहे. कारण महिला नेहमीच त्यांच्या दिसण्याबद्दल अधिक काळजी घेत आल्या आहेत. ३० वर्षांपूर्वी पुरुषांकडे मागे वळून पाहताना, ते नेहमीच सूट घालायचे. आज लग्नात सूट घातलेले पुरुष क्वचितच दिसतात. ते ठळक प्रिंट असलेले रंगीबेरंगी कपडे घालण्यास आनंदी असतात. म्हणूनच ट्रेंडिंगमध्ये लक्षणीय बदल झाला आहे.

गेल्या काही वर्षांत पुरुषांची फॅशन कशी बदलली आहे आणि आज पुरुष त्यांच्या कपड्यांद्वारे स्वतःला अधिक उघडपणे व्यक्त करतात. पुरुषांनी सैल कपडे घालणे सामान्य होते. पुरुषांना नेहमीच खूप गंभीर मानले जात असे; परंतु आता ते नाट्यमयरित्या बदलले आहे. पुरुष त्यांच्या कपड्यांद्वारे स्वतःला सुंदरपणे व्यक्त करत आहेत. पूर्वी पुरुषांना काय घालायचे हे माहीत नव्हते. त्यांच्या बायका त्यांचे कपडे निवडत असत. आता पुरुषांना त्यांना नेमके काय हवे आहे, हे माहित आहे. ते ट्रेंडी झाले आहेत.

**कधीकधी खरी प्रेरणा पुस्तकांमधून किंवा प्रेरक भाषणांमधून मिळत नाही, तर जीवनातील कठीण परिस्थितीतून मिळते. सोशल मीडियावर व्हायरल होणारी ही कहाणी असेच एक उदाहरण आहे. एका विद्यार्थ्याला उच्च दर्जाच्या वसतिगृहात प्रवेश नव्हता. कोचिंग नव्हते, लायब्ररी नव्हती. त्याची परिस्थिती इतकी कठीण होती, की त्याला रेल्वे प्लॅटफॉर्मवर शिक्षण घ्यावे लागले. त्याच्या आईने आपल्या मुलाच्या कॉलेजची फी भरण्यासाठी तिच्या बांगड्याही विकल्या. त्या संघर्षाने, कठोर परिश्रमाने आणि त्यागाने एका गरीब कुटुंबातील मुलाला शास्त्रज्ञ बनवले. डॉ. ए. वेलिमुणी हे त्यांचं नाव. कोईमतूर शहरात त्यांचं जीवन व्यतित झालं.**

## रेल्वे प्लॅटफॉर्म बनली स्टडी रूम!


अचिव्हर

हा प्रवास कॉलेजच्या काळात सुरू झाला होता. तेव्हा त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत कमकुवत होती. त्याला शहरातील महाविद्यालय किंवा वसतिगृह परवडत नव्हते. सक्तीमुळे त्याने कमी फी असलेले महाविद्यालय निवडले आणि राहण्यासाठी मोफत सरकारी वसतिगृहावर अवलंबून राहिला. तथापि, वसतिगृह मिळवल्यानंतरही, महाविद्यालयात जाण्याचा खर्च एक मोठी समस्या राहिली. बसचे भाडे इतके जास्त होते, की ते रोजचे ओझे बनले. त्याचे शिक्षण सुरू ठेवणे सोपे नव्हते; परंतु शिक्षण सोडणे हादेखील पर्याय नव्हता. या संघर्षामुळे नंतर त्याचा संपूर्ण दैनंदिन दिनचर्या आणि अभ्यासाचा दृष्टिकोन बदलला. प्रवासी ट्रेनमध्ये त्याच्या समस्येवर उपाय सापडला. स्वस्त विद्यार्थी ट्रेन पास त्याच्या आयुष्यात एक महत्त्वाचा आधार बनला.

त्याला सकाळी लवकर घर सोडावे लागत होते आणि संध्याकाळी उशिरा परतावे लागत होते. प्रवास लांब होता; परंतु खर्च कमी झाला. या बदललेल्या दिनचर्येचा एक परिणाम असा झाला, की त्याला कॉलेजनंतर बरेच मोकळे तास मिळाले. हा वेळ त्याच्यासाठी सर्वात मौल्यवान ठरला. कोणतेही वर्ग नाहीत, ग्रंथालये नाहीत. फक्त रेल्वे स्थानकाचा शांत प्लॅटफॉर्म आणि हातात पुस्तके. हा प्लॅटफॉर्म हळूहळू त्याचा नियमित वर्ग बनला. त्याने एक हजार दिवस रेल्वे प्लॅटफॉर्मवर सुमारे सहा हजार तास अभ्यास केल्याचे सांगितले. तिथेच गणित, भौतिकशास्त्र आणि रसायनशास्त्र यासारख्या विषयांचा अभ्यास केला आणि संशोधन केले.

ट्रेनची वाट पाहत असताना, त्याने प्लॅटफॉर्मच्या बाकावर किंवा जमिनीवर बसून त्यांचा पाया मजबूत केला. त्या वेळी घराची जबाबदारी त्याच्या आईवर होती. त्यांची कमाई खूप कमी होती. त्यांच्या मुलाचे शिक्षण खंडित होऊ नये म्हणून त्यांनी प्रत्येक त्रास शांतपणे सहन केला. कॉलेज फी भरण्यासाठी त्यांना बांगड्याही विकाव्या लागल्या.

कठोर परिश्रमाचे मोठे फळ मिळाले ही चिकाटीची मेहनत व्यर्थ गेली नाही. प्लॅटफॉर्मवर वाचलेली पुस्तके आणि त्यांच्या शिस्तीमुळे त्यांना नंतर मोठे यश मिळाले. या संघर्ष आणि अभ्यासामुळे त्यांना भाभा अणु संशोधन केंद्रात नोकरी मिळाली. ते त्यांच्या यशाचे श्रेय चार प्रमुख घटकांना देतात, संयम, कठोर परिश्रम, साधेपणा आणि शिस्त. त्यांचा असा विश्वास आहे, की जर परिस्थिती कठीण असेल तर तक्रार करण्याऐवजी त्यांना ताकदीत बदलले पाहिजे. मर्यादित साधनसंपत्ती असूनही, जर एखाद्याने लक्ष केंद्रित केले तर ध्येय कधीही दूर नसते.



## मॅच मेकिंग



### विश्वास कसा ठेऊ?

मी २८ वर्षांचा तरुण असून व्यवसायाने डॉक्टर आहे. माझं एका मुलीवर प्रेम आहे. तीही डॉक्टर आहे. मध्यंतरी तिने मला तिच्यात आणि एका माणसात झालेला संवाद दाखवला. त्यात काही आक्षेपार्ह वाक्य होती. मी तिला त्याबद्दल विचारलं. सुरुवातीला तिने थातुरमातुर उत्तरं दिली. पण बरंच खोदून विचारल्यावर खरं सांगितलं. त्या दोघांमध्ये असं कोणतंही नातं नसल्याचं तिचं म्हणणं होतं. तसंच यानंतर कधीच त्याच्याशी बोलणार नसल्याचं आश्वासनही दिलं. पण ते दोघं एकाच रुग्णालयात काम करतात. त्यामुळे तिच्यावर विश्वास ठेवणं मला खूप जड जात आहे. या अविश्वासामुळे आमच्यात वाद होतात. ही बाब लक्षात आल्यानंतर तिने मला तिच्या पालकांकडे नेलं. आता ती रोज माझ्याशी बोलते. मला तिच्यात काहीच संशयास्पद वाटत नाही. मी तिच्यावर कसा विश्वास ठेवू?

उत्तर : मित्रा, विश्वास हा कोणत्याही नात्याचा पाया असतो. अविश्वासामुळे नातं तुटू शकतं. सध्या तुझ्या नात्यातही अविश्वास निर्माण झाला आहे. विश्वासाशिवाय नात्याला खरं तर काहीच अर्थ राहात नाही. एकदा हरवलेला विश्वास पुन्हा मिळवणं कठीण होऊन बसतं. मला वाटतं तिने एकदा तुझा विश्वास तोडला. पण तिला तिच्या चुकीची जाणीव झाली असावी. म्हणूनच तिने तुला तिच्या पालकांकडे नेलं. ती अशी चूक पुन्हा करणार नाही. तुलाही आता काही संशयास्पद वाटत नाही. मला वाटतं, तू अजूनही ती घटना विसरू शकलेला नाहीस. तुझ्या डोक्यात तेच विचार येत आहेत. सर्वात आधी काही गोष्टींचा शांतपणे विचार कर. तिची चूक तुझ्या प्रेमापेक्षा मोठी आहे का, तू तिला माफ करू शकतोस का हे ठरव. मगच पुढचा निर्णय घे. तू तिला माफ करू शकत असशील तर सगळं काही विसरून पुढे जा. प्रत्येकाकडून चुका होतात. त्यामुळे तिला माफ कर आणि तुमचं नातं घट्ट करण्याचा प्रयत्न कर.

## फॅशन फॉर डिनर डेट

मॅच मेकिंग

मित्रांनो, एखाद्या खास व्यक्तीसोबत डिनरला जायचं तर पेहरावही हटकेच असायला हवा. डिनर डेटला बोअरिंग कपडे घालून जाता येणार नाही. काही तरी ट्रेंडी, फॅशनेबल असायला हवं. पण दिवसभर ऑफिसमध्ये काम केल्यानंतर डिनर डेटची फॅशन करायची तरी कशी, असा प्रश्न तुम्हाला पडला आहे का? काळजी करू नका. तुमच्या डिनर डेटसाठी या काही फॅशन टिप्स.

- मित्रांनो, या दिवसासाठी कलर ब्लॉक्ड शर्टची निवड करा. त्यासोबतच छानशी चिनोज घाला. मस्तपैकी लेदर लोफर्स घाला. तुम्ही डिनर डेटसाठी तयार आहात.
- प्रिंटेड शर्टमुळे तुमचा मूड बदलू शकतो. मस्तपैकी रोमँटिक मूड हवा असेल तर मस्तपैकी प्रिंटेड शर्ट निवडा. कॅज्युअल लूकसाठी क्रॉप्ड ट्राउझर आणि स्लीम फिट फ्लोरल प्रिंटेड शर्ट कॅरी करा. क्लासिक ऑक्सफर्डने तुमचा लूक खुलवा.
- ऑफिस आणि डिनर डेट यांचा ताळमेळ बसवणं जरा कठीण असतं. ऑफिसमध्ये फॉर्मल्स घालावे लागतात आणि डिनर डेटला काहीतरी कॅज्युअल हवं असतं. अशावेळी क्रिस्प शर्ट आणि ट्राउझर कॅरी करा. यामुळे कॅज्युअल आणि फॉर्मल्सचा ताळमेळ साधला जाईल.
- दोस्तांनो, बऱ्याच ऑफिसमध्ये वीकेंडला कॅज्युअल घालायला परवानगी असते. तुमची डिनर डेट वीकेंडला असेल तर काळजीच मिटली. झक्कास बॉम्बर जॅकेट कॅरी करा. प्रिंटेड बॉम्बर जॅकेट असल्यास उत्तम. कॉटन ट्राउझर्स आणि लेदर स्नीकर्सनी आपला लूक खुलवा.
- तुमच्या लूकला थोडा देसी तडका द्या. लिनन ट्राउझरवर कुर्ता कॅरी करा. त्यावर स्नीकर्स घाला. या लूकमध्ये तुम्ही उठून दिसाल.



## डिजिटल क्लासरूमची क्रांती

इ-क्लासरूम

ऑनलाइन प्लॅटफॉर्म मुळे शिक्षण घेण्याची पद्धत आणि स्वत: मधील कौशल्य वाढवण्यासाठीचे क्षेत्र बदललेले आहे. त्याचबरोबर पारंपरिक शिक्षण पद्धतीपेक्षा शिक्षणाचा मापदंड कामाची पद्धत त्याचा व्यवस्थापन आणि इतर गोष्टींमुळे विद्यार्थी हे ऑनलाईन प्लॅटफॉर्मकडे जास्त प्रमाणात वळत आहेत.

यासाठी कोर्सेरा, अपग्रेड, एडेक्स, स्वयम यासारखे ऑनलाईन प्लॅटफॉर्म उपलब्ध आहेत. हे प्लॅटफॉर्म्स अतिशय सुव्यवस्थापित आणि फ्लेक्झिबल असून इथे खिशाला परवडणाऱ्या दरात त्या त्या क्षेत्राशी संबंधित सर्व गोष्टी शिकता येतात. करिअरमध्ये प्रगती करण्यासाठी आणि स्वत:साठी ऑनलाईन लर्निंग हा शिक्षणासाठीचा उत्तम पर्याय आहे. गेल्या दशकापासून ऑनलाईन लर्निंगचे प्रमाण वाढत चालले आहे. यात सातत्याने क्रांती घडून येत आहे.

आता दूरशिक्षण पद्धत नियमित झाली असून डिजिटल क्लासरूम मुळे शिक्षण क्षेत्राच्या भौगोलिक अडचणी दूर झाल्या आहेत. संपूर्ण भारतामध्ये सरकारने ई लर्निंगसाठी स्वयम आणि दीक्षा अशा शासकीय सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.



भारतामध्ये स्टार्टअप ही संकल्पना उदयास आली यामुळे जागतिक स्तरावरचे संशोधनात्मक अभ्यास, शाखा सहजपणे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचले आहेत. नोकरी करत शिक्षणाची संधी : व्यावसायिकांना शिक्षणासाठी त्यांची नोकरी सोडण्याची गरज भासत नसून ते नोकरी करता करता एमबीए आणि इतर शाखेतील शिक्षण सहज घेऊ शकतात. कमी खर्च : एमबीए आणि पीजीडीएम सारखे शिक्षण हे पूर्णवेळ शिक्षणाच्या किमतीच्या मानाने अतिशय कमी आणि सर्वसामान्य खिशाला परवडणारे उद्योगाशी सुसंगत कौशल्य : डिजिटल पद्धतीने घेतलेले शिक्षण हे पारंपरिक शिक्षण पद्धतीपेक्षा वेगळे आणि उद्योगाशी निगडित असणाऱ्या कौशल्यांना बळ देणारे आणि त्यांच्याशी सुसंगत असणारेच शिक्षण दिले जाते.



## अनोखं जबलपूर

भटकंती

दोस्तांनो, मध्य प्रदेशमध्ये बघण्यासारखं खूप काही आहे. आपल्याला इंदूर, भोपळ ही शहरं माहीत आहेत. यासोबतच जबलपूरमध्येही तुम्ही बरंच काही बघू शकता.

- इथला धुवांधार धबधबा खूप प्रसिद्ध आहे. पंधरा मीटर उंचीवरून पडणारा हा धबधबा खूपच सुंदर आहे. हा धबधबा खाली कोसळत असताना धूरकट आणि धुक्यासारखं वातावरण दिसतं. यामुळे या धबधब्याला धुवांधार धबधबा असं म्हटलं जातं. धुवांधार धबधबा बघण्याचा अनुभव खूप भन्नाट असतो.
- जबलपूरमध्ये लहान–मोठे मिळून एकूण ५० तलाव आहेत. यापैकी हनुमान तलाव सर्वात प्रसिद्ध आहे. या तलाव खूप सुंदर दिसतो. हे एक धार्मिक स्थळही आहे. इथे पर्यटक मोठ्या संख्येने येतात.
- इथे भेडाघाट नावाचं ठिकाण आहे. या भेडाघाटमध्ये संगमरवराचे खडक आढळतात. सूर्यप्रकाशामुळे हे खडक चमकू लागतात. या भागातून नदीही वाहते. या खडकांचं प्रतिबिंब नदीच्या पाण्यात पडतं. हे दृश्य खूप अनोखं भासतं.
- जबलपूरमध्ये बॅलन्सिंग रॉक्स आहेत. म्हणजे एकावर एक असणारे दोन दगड,. ज्वालामुखीमुळे या दगडांची निर्मिती झाल्याचं म्हटलं जातं. बॅलन्सिंग रॉक्स हे जबलपूरमधलं एक आश्चर्य आहे.

## महत्त्व वृत्तपत्र वाचनाचं!

स्पर्धा परीक्षा



वर्तमानपत्र वाचल्याशिवाय अनेकांना चैन पडत नाही. विद्यार्थी आपलं सामान्य ज्ञान वाढवण्यासाठी दररोज पेपर वाचतात. पण स्पर्धा–परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वर्तमानपत्र वाचणं खूप महत्त्वाचं असतं. त्यांना फक्त एकाच वृत्तपत्रावर अवलंबून राहून चालत नाही. तर मराठी, हिंदी, इंग्रजी वृत्तपत्रांवर नजर ठेवावी लागते. अर्थात वृत्तपत्र वाचणं सोपं वाटत असलं तरी स्पर्धा–परीक्षांची तयारी करताना ते विशिष्ट पद्धतीने वाचावं लागतं. तुम्हीही स्पर्धा–परीक्षांची तयारी करत असाल तर या टिप्स उपयुक्त ठरू शकतील.

८ वृत्तपत्र डोळ्यांसमोर ठेऊन वाचत बसण्यापेक्षा त्यातल्या महत्त्वाच्या बातम्यांवर तुमची नजर असायला हवी. आता महत्त्वाच्या बातम्या कोणत्या हे ठरवण्यासाठी तुम्ही तुमच्या परीक्षेचे तीन ते चार वर्षांपूर्वीपासूनचे पेपर नजरेखालून घाला. यामुळे कोणत्या प्रकारचे प्रश्न विचारले जातात हे तुमच्या लक्षात येईल आणि तुम्ही त्या विषयांशी संबंधित बातम्यांवर भर देऊ शकता.

८वृत्तपत्राचं पहिलं पान खूप महत्त्वाचं असतं. पहिल्या पानावर देशाविदेशातल्या महत्त्वाच्या बातम्यांना स्थान दिलेलं असतं. त्यामुळे पहिल्या पानाकडे नीट लक्ष द्या.

८ संपादकीय पानावर अग्रलेख तसंच विविध विषयांवरची मतं मांडणारे, एखाद्या घटनेचं विश्लेषण करणारे लेख असतात. या लेखांमुळे तुमच्या ज्ञानात भर पडते. तुम्ही तुमचं ठोस मत बनवू शकता. ही माहिती मुलाखतीदरम्यान उपयोगी पडू शकते.

८ यासोबतच आर्थिक घडामोडी, राष्ट्रीय तसंच आंतरराष्ट्रीय बातम्या, क्रीडाविषयक घडामोडी, राज्यातल्या महत्त्वाच्या घडामोडी याकडेही लक्ष ठेवावं लागतं.

# सत्कर्म करुन भगवंतांचे नामस्मरण केले पाहिजे

**सचिन जगताप यांचे प्रतिपादन; फुलसौंदर मळा येथील अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता**

नगर – अहिल्यानगर ही संताची भुमी आहे. ज्ञान आणि अध्यात्म या क्षेत्रात अग्रेसर आहे. आपल्याला उज्वल संस्कृतीचा वारसा आहे. विविधतेत एकता ही भारताची संस्कृती आहे. भारतीय संस्कृती पाश्चिमत्य देशाप्रमाणे आधारलेली नसून, त्यागावर आधारलेली आहे. त्यासाठी सर्वांनी अध्यात्माचा प्रचार व प्रसार करावा, त्यातुनच मनुष्याला शांती लाभणार आहे. मनुष्य जन्म हा आपला व आपल्या कुळाचा उद्धार करण्यासाठी मिळालेला आहे. या जन्मात आपण सत्कर्म करुन भगवंतांचे नामस्मरण केले पाहिजे, अखंड हरिनाम सप्ताह ही काळाची गरज बनली आहे त्यामाध्यमातून अध्यात्माचे विचार येणारे पिढीसाठी मौलिक असणार आहे, असे प्रतिपादन आयुर्वेद सेवा मंडळाचे अध्यक्ष सचिन जगताप यांनी मांडले.



बुरुडगांव रोड येथील फुलसौंदर मळा येथे अखंड हरिनाम सप्ताहांतर्गत काल्याची हंडी हभप अमोल महाराज जाधव व आयुर्वेद सेवा मंडळाचे अध्यक्ष सचिन जगताप यांच्या हस्ते फोडण्यात आली.

बुरुडगाव रोड येथील फुलसौंदर मळा येथे अखंड हरिनाम सप्ताहांतर्गत काल्याची हंडी हभप अमोल महाराज जाधव व सचिन जगताप यांच्या हस्ते फोडण्यात आली. याप्रसंगी माजी महापौर भगवान फुलसौंदर, भिंगार बँकेचे संचालक विष्णू फुलसौंदर, शितलताई जगताप, नगरसेविका सुनीता फुलसौंदर, अश्विनी लोंढे, नगरसेवक गणेश कवडे, दत्ता गाडळकर, महेंद्र पडोळे, अंबादास गारुडकर, प्रा. संजय गारुडकर, राजेंद्र फुलसौंदर, गणेश फुलसौंदर, एल.के. आव्हाड, कारभारी सुपेकर, इंजि.अनिल साळूंके, संजय चाफे, पुरुषोत्तम चाफे, बाळासाहेब उबाळे आदि उपस्थित होते.

यावेळी बोलतांना हभप अमोल महाराज जाधव म्हणाले, आजच्या धावपळीच्या जीवनात मनुष्य एवढा व्यस्त झाला आहे की, आपण कुठे चाललो, काय करतो याचे भान राहिले नाही; त्यामुळे मनुष्यास शांती मिळत नाही. मनुष्यास जर समाधान, शांती पाहिजे असेल तर अध्यात्माशिवाय पर्याय नाही. गेल्या २७ वर्षांपासून भगवान फुलसौंदर हे सप्ताहाच्या माध्यमातून परिसरातील नागरिकांना हा मोठा लाभ मिळवून देत आहे. त्यामुळेच सप्ताहातील किर्तने, प्रवचने ऐकण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी होत आहे.

याप्रसंगी भगवान फुलसौंदर म्हणाले, गेल्या २७ वर्षांपासून या सप्ताहाचे आयोजन करण्यात येत असून, भाविकांचाही त्यास मोठा प्रतिसाद मिळत असतो. परिसरातील नागरिकांना आध्यात्मिकेतेचा लाभ व्हावा, यासाठी दरवर्षी महाराष्ट्रातील किर्तनकार, प्रवचनकारांची अमृतवाणीचे पर्वणी देत आहोत. त्याचबरोबर मंडळाच्यावतीने सामाजिक उपक्रमही राबविले जात असतात. तसेच वर्षभर मंडळाच्यावतीने वृक्षारोपण, गुणवंतांचा सत्कार, योग शिबीरे अशा सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असते.

याप्रसंगी विष्णू फुलसौंदर म्हणाले, आज मनुष्य शिकून कितीही मोठा झाला तरी त्याला अनेक बाबतीत आध्यात्माचा आधार घ्यावा लागतो. प्रगती करावी परंतु आपली संस्कृती, इतिहास हा जपला पाहिजे. संत विचार हे आजही आपणास मार्गदर्शक ठरत आहे. त्यासाठीच गेल्या २७ वर्षांपासून हा ज्ञानयज्ञ सुरु असल्याचे सांगितले.

याप्रसंगी सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, अध्यात्मिक क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव करण्यात आला. सप्ताह काळामध्ये संतसेवा केली. त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी उकृष्ट रांगोळी काढल्याबद्दल आर्किटकट अपर्णा फुलसौंदर, अविनाश दळवी, संतोष म्हस्के, साधना रमेश कोठारी, गौरव बोरुडे, मुळचंद महाराज आदींचा सन्मान करण्यात आला. काल्याच्या किर्तनानंतर महाप्रसादाचा लाभ भाविकांनी घेतला. सप्ताह यशस्वीतेसाठी महाशिवरात्री उत्सव समिती व वैष्णव मित्र मंडळाच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

यावेळी भिंगार बँकेचे अध्यक्ष अनिलराव झोडगे, उपाध्यक्ष किसनराव चोधरी, शशिकांत महाजन, नामदेव लंगोटे, परेश लोखंडे, अशोकराव कानडे, पांडुरंग नन्नवरे, मधुकर शिंदे, वैभव जगताप, विशाल पवार, प्रकाश इवले, अशोक बाबर आदींसह भाविक उपस्थित होते. काल्याचे कीर्तनाचे महाप्रसादाचे अविनाश दळवी, संतोष म्हस्के, साधना रमेश कोठारी, गौरव बोरुडे, मुळचंद महाराज यांच्यावतीने करण्यात आले. सूत्रसंचालन भास्करराव गायकवाड यांनी केले. अवधूत फुलसौंदर यांनी आभार मानले

# कोठला घासगल्लीतील सार्वजनिक शौचालयाचा प्रश्न गंभीर; सर्वत्र दुर्गंधी, नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**उपमहापौर धनंजय जाधव यांनी केली पाहणी; ८ दिवसांत प्रश्न मार्गी लावण्याचे आदेश**

नगर – अहिल्यानगर शहरातील कोठला घासगल्ली परिसरात असलेले सार्वजनिक शौचालय अत्यंत जीर्णावस्थेत असून, ड्रेनेज लाईन चोक झाल्यामुळे परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली आहे. त्यामुळे येथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. या गंभीर परिस्थितीची दखल घेत उपमहापौर धनंजय जाधव यांनी प्रशासनासह प्रत्यक्ष पाहणी केली आणि ८ दिवसांत प्रश्न मार्गी लावण्याचे आदेश दिले.



कोठला घासगल्लीतील उपमहापौर धनंजय जाधव यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. (छाया – लहू दळवी)

कोठला घासगल्ली परिसरात मोठी नागरी वसाहत असून, या भागातील नागरिकांच्या वापरासाठी असलेले सार्वजनिक शौचालय गेल्या काही महिन्यांपासून निकृष्ट अवस्थेत आहे. शौचालयातील ड्रेनेज लाईन चोक झाल्यामुळे सांडपाणी बाहेर येते, आणि त्यामुळे सर्वत्र असह्य दुर्गंधी पसरली आहे. या दुर्गंधीमुळे परिसरातील महिला, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांना श्वसनाच्या त्रासासह आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. स्थानिक नागरिकांनी अनेकदा तक्रारी केल्या असूनही उपाययोजना न झाल्याने अखेर उपमहापौर स्वतः मैदानात उतरले.

पाहणीदरम्यान उपमहापौर धनंजय जाधव यांनी अधिकाऱ्यांना कठोर शब्दांत सूचना देत सांगितले की, कोठला घासगल्लीतील सार्वजनिक शौचालयाचा प्रश्न अत्यंत गंभीर आहे. नागरिकांची यातून होणारी गैरसोय असह्य आहे. त्यामुळे येत्या आठ दिवसांत या ठिकाणचा ड्रेनेज प्रश्न पूर्णतः मार्गी लावावा आणि शौचालयाची स्वच्छता कायम ठेवावी.

त्यांनी पुढे सांगितले, शहरातील नागरिकांचे दैनंदिन प्रश्न सोडवणे हे मनपाचे कर्तव्य आहे. आम्ही 'निरंतर नगरसेवा' या ब्रीदवाक्यानुसार नागरिकांसाठी सतत कार्यरत राहू. उपमहापौरांनी शौचालयाची आतील व बाहेरील स्थिती पाहून संताप व्यक्त केला. त्यांनी संबंधित विभागाला आदेश दिले की, शौचालयातील ड्रेनेज लाईन तातडीने दुरुस्त करावी, दररोज सफाई व फॉगिंगची व्यवस्था करावी, पाण्याची टाकी स्वच्छ ठेवून निर्जंतुकीकरण करावे, परिसरात नियमितपणे स्वच्छता निरीक्षकांची तपासणी व्हावी, नागरिकांनी स्वच्छतेसाठी प्रशासनाबरोबर सहकार्य करावे. शहर स्वच्छ ठेवणे ही फक्त प्रशासनाची नव्हे तर प्रत्येकाची जबाबदारी आहे, असा संदेश त्यांनी दिला.

या पाहणीवेळी नगरसेवक सागर मुर्तडकर, नगरसेविका शितल ढोणे, सुशांत जाधव, सुशांक ढोणे, इंजिनिअर श्रीकांत निंबाळकर, केअरटेकर बाळासाहेब विधाते, भांगरे, तसेच परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# आगामी वर्षात १००० एकल महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचा इष्टांक; सर्वांचा सहभाग आवश्यक : जिल्हाधिकारी

नगर – जिल्ह्यात सुरू असलेल्या एकल महिला सक्षमीकरण अभियानाअंतर्गत आगामी वर्षात जिल्ह्यातील एक हजार एकल महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचा इष्टांक निश्चित करण्यात आला असून या कामात सर्व शासकीय विभाग, स्वयंसेवी संस्था, प्रशिक्षण संस्था,औद्योगिक आस्थापना अशा सर्वांचा सहभाग आवश्यक आहे, अशी अपेक्षा जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी व्यक्त केली.

जिल्हा एकल महिला सक्षमीकरण कार्यक्रम समितीची बैठक सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयात झाली. त्यावेळी डॉ.आशिया बोलत होते. यावेळी कौशल्य विकास समितीचे सदस्य विनायक देशमुख, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालिका मंजुषा थवकर, उमेद चे जिल्हा व्यवस्थापक सोमनाथ जगताप, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी बाळासाहेब मुंडे, कौशल्य विकास अधिकारी शुभदा पाठक, माविमचे दिपक माने, बार्टीचे दिलावर सय्यद, महापालिकेच्या सुप्रिया घोगरे, जिल्हा उद्योग केंद्राचे श्री. हवालदार, महिला व बालकल्याण विभागाचे अमोल गोसावी, सामाजिक न्याय विभागाचे संजय कावरे, साऊ संस्थेचे मिलिंदकुमार साळवे, आरसेटीचे आर.जी.देशमुख, लीड बँकेचे जिल्हा व्यवस्थापक आशिष नवले, बालविकास प्रकल्प अधिकारी देवेंद्र राऊत, स्वामिनी संस्थेच्या शीतल आंग्रे, सीवायडीए च्या आरती बेरड आदी उपस्थित होते.



जिल्हा एकल महिला सक्षमीकरण कार्यक्रम समितीच्या बैठकीत बोलताना डॉ. पंकज आशिया.

बैठकीत मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया म्हणाले, जिल्ह्यातील नगरपालिका व महानगरपालिकेची निवडणूक आता पूर्ण झालेली आहे. त्यामुळे सर्व संबंधित प्रशासकीय यंत्रणांनी नागरी भागातील एकल महिलांच्या सक्षमीकरण कार्यक्रमासाठी विशेष लक्ष देऊन पुढाकार घ्यावा.

प्रारंभी समितीचे सदस्य सचिव सोमनाथ जगताप यांनी मागील बैठकीच्या इतिवृत्ताचा व त्याबाबतच्या प्रगतीचा आढावा सादर केला.

यावेळी विनायक देशमुख म्हणाले, जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पा. यांच्या संकल्पनेतून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती वर्षाच्या निमित्ताने अहिल्यानगर जिल्ह्यात सुरू करण्यात आलेल्या एकल महिला सक्षमीकरण कार्यक्रम राज्याला नवी दिशा देणारा आहे. त्याअंतर्गत पहिल्या टप्प्यात निश्चित केलेले जिल्ह्यातील ३०० एकल महिलांना सक्षम करण्याचे उद्दिष्ट २६ जानेवारी २०२६ पर्यंत पूर्ण झाले आहे. आता आगामी काळात १००० महिलांना आर्थिक दृष्ट्यासक्षम करण्याचा इष्टांक निश्चित करण्याचा निर्णय स्वागतार्ह आहे. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे या कामाला वेग आला आहे. आतापर्यंत या योजनेअंतर्गत आर्थिक दृष्ट्यासक्षम झालेल्या ३०० एकल महिलांचा लवकरच पालकमंत्र्यांसमवेत संवाद कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे.

नुकत्याच झालेल्या साई ज्योती २०२६ या प्रदर्शनात १५० पेक्षा जास्त महिला बचतगट सहभागी झाले होते. त्यामध्ये २१ गट हे एकल महिलांचे होते. या प्रदर्शनाच्या चार दिवसांत २.७५ कोटी रुपयांची आर्थिक उलाढाल झाली, अशी माहिती उमेद चे जिल्हा व्यवस्थापक सोमनाथ जगताप यांनी दिली.

जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांच्या मार्गदर्शनाखाली नुकत्याच झालेल्या साई ज्योती २०२६ या महिला बचत गटनिर्मित वस्तुंच्या विक्री प्रदर्शनाच्या यशस्वी आयोजनाबद्दल उमेद चे अभिनंदन करणारा ठराव विनायक देशमुख यांनी मांडला. एकमताने यावेळी हा ठराव मंजुर करण्यात आला.

२०२६/२७ या वर्षासाठी निश्चित करण्यात आलेल्या १००० एकल महिला सक्षमीकरण इष्टांक पुर्ती साठी विविध शासकीय विभाग, स्वयंसेवी संस्था व प्रशिक्षण संस्था यांना स्वतंत्र इष्टांक देण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला.

# स.पो.नि.प्रल्हाद गीते यांची झाली राहुरी येथे बदली, गणेश वारूळेंकडे तालुका पोलीस ठाण्याचा पदभार

नगर – अरणगाव (ता. नगर) येथील मिठू कार्तिक दत्त (वय ४२) यांच्या मारहाणीतून झालेल्या मृत्यूनंतर खुनाचा गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ केल्याच्या आरोपावरून तपास अधिकारी तथा नगर तालुका पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रल्हाद गीते यांची राहुरी पोलीस ठाण्यात बदली करण्यात आली आहे. तोफखाना पोलीस ठाण्यातील सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश वारूळे यांच्याकडे तालुका पोलीस ठाण्याचा प्रभारी पदभार देण्यात आला आहे.





६ मार्च २०२५ रोजी मिठू दत्त यांना बेदम मारहाण करण्यात आली. सुरूवातीला त्यांना अहिल्यानगरमधील खासगी रूग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र प्रकृती गंभीर झाल्याने त्यांना पुणे येथे हलविण्यात आले. २३ मार्च रोजी त्यांचा मृत्यू झाला. तथापि, २९ मार्च रोजी नगर तालुका पोलीस ठाण्यात केवळ 'अकस्मात मृत्यू'ची नोंद करण्यात आली.

पुढील तपास स्वतः एपीआय गीते यांनी हाताळला, मात्र खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला नाही. तक्रार झाल्यानंतर अधीक्षक घार्गे यांनी तात्काळ दखल घेत सुपा पोलीस ठाण्याच्या निरीक्षक ज्योती गडकरी यांच्याकडे चौकशी सोपविली. गडकरी यांच्या तपासात धक्कादायक बाबी समोर आल्या. मिठू दत्त यांचा मृत्यू अपघाती नसून मारहाणीमुळे झालेला खून असल्याचे स्पष्ट झाले. त्यानुसार पाच जणांविरूध्द खुनासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गडकरी यांच्या तपासामुळे गीते यांच्या भूमिकेबाबत गंभीर संशय निर्माण झाला आहे. गीते यांची खातेनिहाय चौकशी करण्याचे आदेश अधीक्षक घार्गे यांनी दिले असून ही चौकशी उपअधीक्षक शिरीष वमने यांच्याकडून सुरू आहे. चौकशी सुरू झाल्यानंतरही गीते यांचे प्रभारीपद कायम होते. आता मात्र अधीक्षक घार्गे यांनी त्यांची बदली राहुरी पोलीस ठाण्यात केली आहे. खातेनिहाय चौकशी पूर्ण झाल्यानंतर उपअधीक्षक वमने हे अधीक्षक घार्गे यांना अहवाल सादर करतील आणि त्यानंतर पुढील कारवाई अपेक्षित आहे.

दरम्यान, सहाय्यक निरीक्षक गणेश वारूळे यांच्याकडे प्रभारी पदभार सोपविण्यात आला असून तालुक्यातील कायदा व सुव्यवस्था सुरळीत करण्याची मोठी जबाबदारी त्यांच्या खांद्यावर आली आहे. वारूळे तालुक्यात कायदा सुव्यवस्थेची घडी बसवतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# पुनर्सर्वेक्षण करून कर आकारणी करावी

**नगरसेवक ऋग्वेद गंधे यांची मागणी**

नगर – महानगरपालिकेने रहिवाशांना घरपट्टी व पाणीपट्टीचे बिले दिली आहेत. मात्र मनपाने बऱ्याच नागरिकांना प्रत्यक्ष क्षेत्रफळापेक्षा जादा जागा दाखवून त्यावर आधारित घरपट्टी आकारण्यात आलेली आहे. त्यामुळे नागरिकांवर आर्थिक बोजा पडला आहे. त्यामुळे मनपाने प्रभाग ३ मधील भागाचे पुनर्सर्वेक्षण करून कर आकारणी करावी, अशी मागणी नगरसेवक ऋग्वेद गंधे यांनी महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे व महापौर ज्योती गाडे यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.



प्रभाग ३ मधील भागांचे पुनर्सर्वेक्षण करून कर आकारणी करावी, या मागणीचे निवेदन नगरसेवक ऋग्वेद गंधे यांनी आयुक्त यशवंत डांगे यांना दिले.

नगरसेवक गंधे यांनी निवेदनात नमूद केले आहे की, प्रभाग ३ मधील भागातील रहिवाश्यांना जादा घरपट्टी आकारणीचे बिले प्राप्त झाली आहेत. मनपाने खासगी संस्थेमार्फत केलेल्या घरांच्या मोजमापामध्ये अनेक चुका झाल्याचे निदर्शनास आले आहे. काही ठिकाणी प्रत्यक्ष क्षेत्रफळापेक्षा जादा जागा दाखवून त्यावर आधारित घरपट्टी आकारण्यात आलेली आहे. या त्रुटीमुळे सर्वसामान्य नागरिकांवर आर्थिक भार पडत असून त्यांच्यामध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे प्रभाग ३ मधील परिसरातील घरांचे तात्काळ पुनर्सर्वेक्षण करून अचूक मोजमापाच्या आधारे योग्य ती घरपट्टी निश्चित करण्यात यावी.



महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या अहिल्यानगर शहर जिल्हाध्यक्षपदी प्रसाद सामलेटी यांची निवड करण्यात आली.

# महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या अहिल्यानगर शहर जिल्हाध्यक्षपदी प्रसाद सामलेटी यांची निवड

नगर – अहिल्यानगर महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद संघटनेच्या नुकतेच झालेल्या सहविचार सभेत शहर जिल्हाध्यक्षपदी प्रसाद सामलेटी व ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी बाबासाहेब बोडखे यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली आहे. त्याचबरोबर ग्रामीण कोषाध्यक्षपदी बबन शिंदे व शहर कार्यवाह म्हणून दीपक आरडे यांची देखील निवड करण्यात आली.

याप्रसंगी शिक्षक परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष प्राचार्य सुनील पंडित, नाशिक विभागाचे अध्यक्ष शरद दळवी, जुनिअर कॉलेज चे प्रमुख सुनील सुसरे, शहराचे कार्यवाह घाडगे, कार्याध्यक्ष दिपक आरडे, ग्रामीण चे कोषाध्यक्ष बबन शिंदे, उपाध्यक्ष नितीन केणे, सचिन गावडे, मार्कंडेय विद्यालयाचे प्राचार्य संदीप छिंदम, तानाजी काळुंगे, शिक्षक, क्रीडा संघटनेचे घनश्याम सानप, प्राथ.संघटनेचे नंदकुमार हंबर्डे, गणेश नागपुरे, विनोद जोशी, अनंत जोशी, अजय महाजन, नांगरे सर, निलेश आनंदास, अभिजित गवारे, शुभम टेमकर, निमसे सर आदी उपस्थित होते.

शिक्षकांचे शैक्षणिक, व्यावसायिक व सामाजिक हित जपण्यासाठी संघटनेने राबविलेल्या उपक्रमांमध्ये श्री. सामलेटी यांचे योगदान उल्लेखनीय आहे. अध्यापन क्षेत्रातील त्यांचा प्रदीर्घ अनुभव, संघटन कौशल्य व नेतृत्वगुण यांचा विचार करून श्री.सामलेटी यांची निवड करण्यात आली आहे, असे पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

# भिंगार येथे 'शिव आराधना' भक्ती संगीत कार्यक्रमाने रसिक मंत्रमुग्ध

नगर – महाशिवरात्रीच्या पवित्र दिवशी अहिल्यानगर येथील श्री ज्ञानसरस्वती संगीत निकेतन यांच्या वतीने आयोजित 'शिव आराधना' हा भक्ती संगीताचा कार्यक्रम भिंगार येथील श्री शुक्लेश्वर महादेव मंदिर या प्राचीन मंदिरात भक्तिभावाने झाला. निकेतनच्या संचालिका व गायिका संपदा चौधरी यांच्या सुमधुर गायनाने संपूर्ण परिसर शिवमय झाला. 'ओम नमः शिवाय', 'कैलास के निवासी', 'नाम तुझे बरवे गा देवा', 'हे भोळ्या शंकरा' आदी गाजलेली भक्तीगीते सादर करत त्यांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्या सादरीकरणातील भाव, लय आणि सूर यांच्या संगमामुळे उपस्थित भाविकांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली.



महाशिवरात्रीनिमित्त भिंगार येथे 'शिव आराधना' भक्ती संगीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमात श्री ज्ञानसरस्वती संगीत निकेतनच्या विद्यार्थ्यांनी सहगायन करून कार्यक्रमाची रंगत वाढवली. गौरांग औरगोंडा, रिद्धी गांधी, स्वरा महाबळ, मुक्ता बोठे, आनंदी घाडगे, सर्वेश कटारे व रमा द्यावनपेल्ली या बालचमूने शिस्तबद्ध व सुरेल सहगायन सादर केले. तबल्यावर तबलावादक हर्षद भावे यांनी प्रभावी साथ दिली; बॅन्जोवर कुलदीप चव्हाण तर ऑक्टोपॅडवर ऋषिकेश साळवे यांनी लयीला आधुनिक रंगत आणली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सौ. अपर्णा बालटे यांनी संयत व प्रवाही शैलीत केले.

या भक्ती संगीत कार्यक्रमास श्री व सौ. प्रमोद मुळे, शुक्लेश्वर मंदिर ट्रस्टचे सदस्य श्याम पांढरे, राम पांढरे, अमित महाराज धाडगे, कृषी अधिकारी श्री व सौ. अत्रे, संस्कार भारतीचे अध्यक्ष श्री व सौ. शर्मा तसेच सचिव श्री व सौ. देशपांडे यांची उपस्थिती लाभली. महाशिवरात्रीच्या मंगल पर्वावर झालेल्या या 'शिव आराधना'मुळे भिंगार परिसरातील रसिक श्रोते व भाविक मंडळी अध्यात्मिक आनंदात न्हाऊन निघाली.

# 'हिंद दी चादर' गुरु तेग बहादूर साहीबजी यांच्या स्मृतिप्रित्यर्थ महानगरपालिकेच्यावतीने १७ ते २५ फेब्रुवारी दरम्यान आरोग्य केंद्रांवर शिबीर

नगर – अहिल्यानगर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत हिंद दी चादर गुरु तेग बहादूर साहीबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम शताब्दी वर्षानिमित्त शहरात विशेष 'आरोग्य पंधरवाडा' आयोजित करण्यात आला आहे. या मोहिमेअंतर्गत १७ ते २५ फेब्रुवारी या कालावधीत शहराच्या विविध भागांत आरोग्य केंद्रांवर मोफत आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले असून, नागरिकांनी याचा लाभ घेण्याचे आवाहन आयुक्त यशवंत डांगे यांनी केले आहे.

या पंधरवाड्यांतर्गत शहरातील विविध नागरी आरोग्य केंद्रे, आयुष्मान भारत आरोग्य केंद्र आणि हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे 'आपला दवाखाना' येथे सकाळी १० ते २ या वेळेत शिबिरे होतील. यामध्ये १७ फेब्रुवारी रोजी केडगाव, १८ फेब्रुवारी रोजी जिजामाता, २० फेब्रुवारी रोजी महात्मा फुले, २१ फेब्रुवारी रोजी तोफखाना, २३ फेब्रुवारी रोजी सावेडी, २४ फेब्रुवारी रोजी नागापूर आरोग्य केंद्र येथे शिबिर होईल. २२ फेब्रुवारी रोजी भाईसिंगजी दया गुरुद्वारा, गोविंदपुरा येथे महानगरपालिका आणि जिल्हा रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळेत विशेष शिबिर आयोजित करण्यात आले आहे. तर, २५ फेब्रुवारी रोजी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे 'आपला दवाखाना' नालेगाव व श्रमिकनगर येथेही शिबिर होणार आहे.

शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांकडून सर्वसाधारण आरोग्य तपासणी, रक्तदाब, मधुमेह (शुगर) आणि कॅन्सरची प्राथमिक तपासणी, क्षयरोग निर्मूलन अभियानांतर्गत हाय रिस्क रुग्णांची तपासणी व आवश्यकतेनुसार मोफत एक्स–रे सुविधा, पात्र लाभार्थ्यांसाठी 'आयुष्मान कार्ड' आणि 'आभा कार्ड' काढून देण्याची सुविधा, विविध प्रकारच्या लॅब टेस्ट आणि इतर वैद्यकीय उपचार करण्यात येणार आहेत. नागरिकांनी आपल्या जवळच्या आरोग्य केंद्रात जाऊन या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयुक्त यशवंत डांगे यांनी केले आहे.

